।। श्री तुळजाभवानी नम: ।।

# ।। श्री तुळजाभवानी नवशती ।।

## (रामवरदायिनी)

**वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे**

(B.A.M.S.)

मनकर्णिका पब्लिकेशन

मनकर्णिका प्रकाशन पुष्प – **३७**

- **।। श्री तुळजाभवानी** (रामवरदायिनी) **नवशती।।**


- © **वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे**
  (B.A.M.S.)


- **प्रथम आवृत्ती – १५ ऑक्टोबर २०१५**
  **(नवरात्रोत्सव)**

- लेखन सहाय्य
  **सौ. प्रियंवदा अरविंद जोशी**

- अक्षरजुळणी
  **सौ. अर्चना गजानन एकतारे**
  **श्री. गजानन अमृत एकतारे**

- मुखपृष्ठ
  **नयना मते**

- प्रकाशक
  **गिरीश दगडूलाल गांधी**
  **'मनकर्णिका पब्लिकेशन'**
  विशाल अपार्ट., पडवळ आळी,
  चिंचवडगाव, पुणे – ४११ ०३३.
  मो. – ९९२१६२५३८४
  E-mail: manakarnikapc@gmail.com

- मुद्रक
  **'भाग्यश्री ऑफसेट प्रिंटर्स',**
  संगमवाडी, पुणे – ४११ ००३.

- मूल्य ₹ ५०/– (पन्नास रुपये मात्र)

।। श्री शंकरमहाराज नमः ।।



।। श्री तुळजाभवानी नम:।।









।। श्री ।।

# ।।मनोगत।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री तुळजा भवानी माता माऊली।
प्रत्यक्ष स्वरुपी मायेची साऊली।।
भक्तांची तारक ही माझी माऊली।
भक्त गणेशास ऐसी प्रसन्न झाली।।
नवशती स्वरुपी प्रत्यक्ष झाली।
भक्तांना मायेची ऐसी पाखर लाभली।।

खरोखरच ही नवशती भक्तांच्या हाती देताना मन गहीवरून येते आहे. मातेचा कृपा प्रसाद आणि स्वामींचा वरदहस्त यामुळेच ही श्री तुळजाभवानी (रामवरदायिनी) नवशती साकार झाली. प्रत्येक

शब्दाशब्दातूनच नव्हे, तर अक्षरा अक्षरातून आपल्या कृपेचा वर्षाव स्वामी समर्थांनी केला आणि त्या प्रभावामुळे प्रत्यक्ष तुळजाभवानी मातेचे अद्वैतरुप अशी ही नवशती तयार झाली. या कृपावर्षावामुळे या भक्त गणेशाचे (संजीवन) मन सद्‌गदीत होत आहे. हा स्वामी प्रसाद व तुळजाभवानीचा वरदहस्त याचा लाभ सर्व भक्तांना व्हावा, ही त्यांचीच इच्छा मी केवळ निमित्तमात्र आहे. सारे त्यांच्या चरणी अर्पून मी माझे मनोगत प्रकट करीत आहे, ही सुद्धा त्यांचीच कृपा नाही का? असो!

आपण सारेच प्रपंचार्थी! पण प्रपंचामध्ये येणाऱ्या विविध समस्यांना सामोरे जाताना आम्हाला परमेश्वराची आठवण होते. कन्नडमध्ये म्हणतातच, 'संकट बंदाग व्यंकटरमण' म्हणजेच संकट आले की व्यंकटरमणाची आठवण होते. तो प्रत्यक्ष परमात्मा, त्याचीच शक्ती या विविध देवींच्या अवतारातून प्रकट होऊन भक्तांचे रक्षण करीत असते. असेच एक रूप म्हणजे माता तुळजाभवानी. अनादी कालापासून तिचे माहात्म्य आहे. प्रत्यक्ष श्रीरामाला तिचा वरप्रसाद लाभला, म्हणूनच ती श्री रामवरदायिनी माता मानली जाते. पांडवांना ती प्रसन्न झाली, हेच काय पण तिने आपल्या भक्तांचे रक्षण करण्यासाठी अवतार धारण करताच प्रत्यक्ष विष्णु-शंकरादि सर्वच देव तिच्या सान्निध्यात राहिले आणि तुळजापूर हे अतिशय विशेष पवित्रस्थान म्हणून प्रसिध्द झाले.

श्री तुळजभवानी मातेचे माहात्म्य शब्दातीत आहे. ते श्री तुळजाभवानी (रामवरदायिनी)

नवशतीत साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. देवी मातेचा वरदहस्त या नवशतीच्या वाचनाने अथवा श्रवणाने, इतकेच काय ही नवशती आपल्या घरात ठेवल्याने सर्व भक्तांना लाभून त्यांच्या सर्व संकटांचा विनाश होऊन सर्व इप्सितार्थ सिद्ध व्हावेत अशी मी भक्तांच्या वतीने आणि माझ्या स्वत: तर्फे श्रीतुळजाभवानी मातेच्या आणि स्वामी समर्थांच्या चरणी प्रार्थना करतो.

श्रीतुळजाभवानी नवशतीच्या लेखन कार्यात मला स्वामीभक्त सौ. प्रियंवदा अरविंद जोशी यांनी साह्य केले. श्री. गजानन अमृत एकतारे अन् त्यांची पत्नी जी मला माझ्या बहिणीसारखीच आहे ती सौ. अर्चना गजानन एकतारे यांनी या ग्रंथास संगणकीकृत करून परममोलाचे सहकार्य दिले आणि मनकर्णिका पब्लिकेशनचे प्रकाशक श्री गिरीश दगडूलालगांधी यांनी या ग्रंथाच्या प्रति मुद्रित करून दिल्या तसेच मुखपृष्ठ नयना मते यांनी केले. या सर्वांना व त्यांच्या कुटुंबीयांना श्री तुळजाभवानी मातेचा आणि श्री स्वामी समर्थांचा कृपाप्रसाद आणि वरदहस्त सदैव लाभो, अशी मी तुळजामाते चरणी विनंती करतो.

याप्रमाणे माझे परम पवित्र तीर्थरूप मातापिता सौ. सिंधुताई शिंदे आणि श्री लक्ष्मण शिंदे यांनी अपरिमित कष्ट सहन करून अतिशय प्रेमाने माझे लालन पालन केले. मी लहान असताना माझी दृष्टी गेली. परंतु माझे मातापिता श्रीस्वामी समर्थांचे परमभक्त, त्यामुळे मला स्वामी समर्थांच्या कृपेचा

लाभ झाला आणि एका फुटापर्यंतचे दिसू लागले, आणि त्याचबरोबर श्रीस्वामी समर्थांकडून दिव्य दृष्टीचा लाभ झाला. ही स्वामीकृपा हा माझ्या मातापित्यांच्या श्रीस्वामी समर्थ भक्तिचा कृपाप्रसाद! आज जे माझे आहे ते सर्वच माझ्या परमपवित्र मातापित्यांचा कृपा आशीर्वाद आहे. आमच्या सर्व कुटुंबीयांवर त्यांचे कृपाछत्र आहेच! ते असेच निरंतर पिढ्या आणि पिढ्या राहील! असे कृपाछत्र सर्व स्वामी भक्तांना लाभो ही त्यांच्या चरणी प्रार्थना करून मी ही श्री तुळजाभवानी (रामवरदायिनी) नवशती माझ्या मातपित्यांना अर्पण करीत आहे!

आपले सारे जीवन सर्वस्व केले ज्यांनी समर्पण।
आमचे तनमन पुष्ट केले दिले सामर्थ्य स्वच्छ मन।।
माझे मातापिता माझे तीर्थ त्यांचे चरण।
करितो अतिशय विनम्र भावे नवशती तयांना अर्पण।।
।। श्री तुळजाभवानी चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।।

**स्वामीभक्त वैंद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे**

# • अनुक्रमणिका •


| अध्याय | पृष्ठ |
|---|---|
| अध्याय पहिला | १० |
| अध्याय दुसरा | २० |
| अध्याय तिसरा | २९ |
| अध्याय चवथा | ३९ |
| अध्याय पाचवा | ४८ |
| अध्याय सहावा | ५७ |
| अध्याय सातवा | ६६ |
| अध्याय आठवा | ७५ |
| अध्याय नववा | ८४ |

# अध्याय पहिला

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमन माझे गणनाथा। अससी तू सकलविद्यादाता। द्यावी बा मज पामरा आता। शक्ती तुळजामहात्म्य वर्णिण्या।।१।। तू अससी सर्व विघ्नहर्ता। तूच अससी सर्व सुखकर्ता। द्यावी मति या सिंधुगणेशसुता। तुळजा नवशती लिहिण्याकरिता।।२।। आता वंदितो वीणापाणी। शारदा सरस्वती विद्यादेवी। तूच निर्गुणा सगुण करवूनी। अक्षररुपी मूर्त करसी।।३।। होता तुझी कृपा शारदे। विश्व अवघे अक्षरे कवळते। अमूर्त शक्तीसही रूप लाभते। प्रत्यक्ष रुप होई महात्म्य।।४।। नमितो मी आज तव चरणी। करावी पावन मम लेखणी। तुळजा महात्म्य लिहीते करवूनी। धन्य करावे या गणेशा।।५।। वंदितो आत तीनही देव। ब्रह्मा विष्णु अन् महेश्वर। तयांचीच शक्ती होई साकार। तुळजारुपे यमुना पर्वती।।६।। श्रोते जनहो व्हावे कृपावंत। ऐकावे श्रोत्री तुळजामहात्म्य। अमृतधारा असे ही वर्षत। व्हावे तृप्त मायबापा।।७।। नमन आता माते मम जननी। सिंधु तू प्रत्यक्ष कृपारुपिणी। पिता पावन लक्ष्मण नामे करुनी। उभयता नमितो साष्टांगी।।८।। नमुनी देवऋषी पितृगण। करीतो आता

ग्रंथारंभ। माता जगदंबेचे हे चरित्र। वर्णितो मी नवशतीत आता।।९।। व्यासोक्त असे जे देवभाषेत। वर्णु पाहतो मी मराठीत। श्रोते तुम्हासी मी विनवित। न्यून ते सर्व पूर्ण करावे।।१०।। तारकासूर बहु मातला म्हणून। वध करी शिवपुत्र षडानन। तयाने संतुष्टले देव सकल। ऋषी थोर तया भेटण्या आले।।११।। आनंदलो तव दर्शने म्हणून। विनविती तयासी ऋषीगण। त्वा कथिली देवी अद्‌भूत। नाव तिचे असे तुळजा।।१२।। परी नाम तिचे तुळजा किमर्थ। प्रगटली यमुना पर्वती किमर्थ। सविस्तर संपूर्ण तिचे चरित्र। सांगावे आम्हासी उमापुत्रा।।१३।। ऐकोनी संतुष्टला स्कंद। म्हणे ऋषी वरिष्ट नाम। विनवितसे तो सदाशिवास। सांगावे मज देवी कथानक।।१४।। ऐकोनी संतुष्ट उमारमण। म्हणे धन्य तुझा भक्तिभाव। सांगेन तुज तुळजादेवी वैभव। नाम तुळजा झाले किमर्थ।।१५।। पूर्वी झाला कृतयुगात। कर्दम नाम द्विज विख्यात। असे तो वेदशास्त्र पारंगत। स्वधर्मरत असे सदा।।१६।। भार्या तयाची नाम अनुभूती। महासाध्वी बहु गुणवती। पतिव्रता तत्पर पतिसेवेसी। असे पतिचरणी प्रेम थोर।।१७।। ऐसे असता मृत्यु पावला भ्रतार। करीतसे ती सहगमन विचार। तदा अंतरिक्ष वाणी बोलत। पुत्रवतीने सती न जावे।।१८।। ऐकोनी अंतरिक्ष देव वाणी। मान्य करीतसे धर्मचारिणी। मग पुत्रा हस्ते करुनी। उचित कर्म ती करवितसे।।१९।। पतीस मानुनी प्रत्यक्ष ईश्वर। करीतसे मी पुत्ररक्षण। पुत्र प्रौढझाला पाहून। मेरु पर्वती ती आली।।२०।। तेथे

मंदाकिनी नदी किनारी। पर्णकुटी निर्मिली चांगली। व्रतस्थ निवासुनी राहीली। अष्टांगयोग ती करीतसे।।२१।। असता ऐसे एक दिनी। कुकुर दानवेश्वर गरुडारुढहोऊनी। मृगयार्थ हिंडे तो काननी। त्याने अनुभूतीस पाहीले।।२२।। पाहुन तियेचे मनमोहक रुप। लोभावून गेला तो मनात। कामातुर तो होऊन बहुत। आला असे तिज जवळी।।२३।। विनवी तो अनुभूती प्रती। म्हणे मी असे त्रैलोक्यपती। मम भार्या होऊनी हो सुखी। मी असे कुकुर नामे दानवेश्वर।।२४।। अनुभूतीचे परी अंतःकरण। ब्रह्मरुपासी झाले संलग्न। नसे तिज देहेंद्रियांचे भान। काहीच उत्तर ती न देई।।२५।। पतिव्रता ती दृढसंकल्प। परी कामातूर कुकुराचे चित्त। दुष्ट कर्मास होई तो प्रवृत्त। विनाशकाले विपरीत मती।।२६।। कुकुर गेला अनुभूती जवळी। स्पर्श अंगासी करी तो बळी। न्यावया तिजला उचलोनी। परी रक्षण करी जगदंबा।।२७।। मारुनी दुर्जना जैसे जडभरतासी। रक्षितसे त्या देवी भद्रकाली। तैसी येऊनी दयाळू माऊली। रक्षण अनुभूतीचे ती करी।।२८।। जेव्हा कुकुर दैत्ये तिज स्पर्शीले। ध्यान तदा सतीचे भंगले। कोण तू पूसे ती अति क्रोधे। दात विचकोन हसे दानव।।२९।। म्हणे तुझे रुप पाहुन सुंदर। झालो असे मी कामातूर। होऊनी माझी भार्या सत्वर। होशीलसुखी तू जगी।।३०।। ऐकून त्याच्या दुष्ट बोलासी। काय करावे न सुचे तिजसी। चिंतातुर झाली ती सती। देता शाप होईलतपोनाश।।३१।। काम क्रोधादि षड्रिपुंनी। घातले मजसी या संसारी। जरी देईन

क्रोधा थारा अंतरी। जनन मरण चक्र न चुकेल।।३२।। शांत जरी राहीन अंतरी। अनर्थ करीलहा दुष्ट अरी। सूचले मग तिज अंतरी। स्तवितसे ती जगन्मातेसी।।३३।। स्मरताच देवी तिने अंतरी। तिज निकट जगदंबा आली। तेजस्वी सिंहारूढशोभू लागली। तेजे शोभे मुखकमळ।।३४।। रुप तियेचे असे अतिसुंदर। बोलणे मधुर मेघ गंभीर। हृदयी तिच्या अमृत पाझर। पूसे का स्मरण केलेसी।।३५।। अनुभूती पाही नेत्र उघडोनी। समोरी जगन्मातेस पाहुनी। साष्टांग नमितसे तिज चरणी। म्हणे नमन माझे तुज माते।।३६।। स्तवितसे ती आदिशक्तीसी। म्हणे द्यावे वरदान मजसी। वधुनी या कुकुर राक्षसासी। करी रक्षण माझे माऊली।।३७।। इतुकेच वरदान मागे अनुभूती। बरे म्हणे तिजसी भगवती। म्हणे मारुन कुकुर दैत्यासी। करीन रक्षण मी तुझे।।३८।। देऊनी तिजसी अभयदान। सोडी असुरावरी देवी बाण। लागला असूर हृदयी बाण। देवीवरी तो रागे धावतसे।।३९।। देवीवरी करुनी शस्त्र प्रहार। रागे येई योगिनीं समोर। तयांवरी करुनी शस्त्रप्रहार। पुनहा येई तो देवी जवळी।।४०।। देवी धावतसे शूळ घेऊनी। मारीतसे दैत्यासी ती कोपोनी। हृदयी थोर व्यथा होऊनी। असुरी माया पसरवी तो दैत्य।।४१।। क्षणात अश्वरुप धारण करी। अतिवेगे तो आकाशी उड्डान करी। मुत्र करोनी लेंड्या सोडी भारी। हय रुपधारी तो दानव।।४२।। वधावया त्यास मग देवी। ताडीतसे त्यासी पंचबाणे करुनी। तेव्हा हयरुप स्वतःचे त्यागुनी। महिषरुप दानव धरीतसे।।४३।। मग शृंगी धरुनी

पर्वत शिखर। फेकीतसे तो मग देवीवर। शरवृष्टी जगदंबा करी त्यावर। भयभीत त्याने महिषरुप सोडले।।४४।। मग धारण करी तो सिंहरुप। क्रोधे गर्जतसे फिरवून पुच्छ। तीव्र नखे तो प्रहार करीत। सिंहरुप मग त्याने त्यागीले।।४५।। होई रथारुढतो धरुन पुरुष रुप। धारण करीतसे तो अति विशालत्व। धनुष्या मग लावूनी आठ बाण। सोडी देवी वरी तो दानव।।४६।। देवीने केला त्याचा रथ चूर। चारी अश्व मारीले सत्वर। नाशिली संग्राम सामग्री समग्र। दानवे मग निर्मिले सैन्य अपार।।४७।। दैत्याने निर्मिले मायावी सैन्य। संग्राम झाल अतिथोर। शस्त्र संपात होई अभिनव। घनघोर युध्द मांडले।।४८।। देवी धावली असुरावरी। छेदिले कुकुर शिर झडकरी। तव त्याचे कंठातून सत्वरी। दुसरा पुरुष निघाला।।४९।। तुळजेने मग पाहून त्यासी। खड्गांगे मारीला तयासी। गतप्राण होऊन पडला धरणीसी। दैत्य तयेवेळी तेधवा ।।५०।। देवीचे गण करती जयजयकार। उदयोऽस्तु म्हणती वारंवार। आनंद सकला झाला थोर। हर्षे निर्भय होऊनी नाचती।।५१।। वरिष्ठ मुनीसी सांगे सदाशिव। रणी मारुनी कुकुर दानव। आली देवी अनुभुती समोर। द्यावया तिजसी वरदान।।५२।। अनुभूती करी देवीसी दंडवत। म्हणे माये झालीसी कृपावंत। कुकुरासुरे दिधले दुःख अमित। परी तू मजसी रक्षिले।।५३।। म्हणे अनुभूती 'देवी भवानी'। तुच माझी माय माऊली। द्यावे वरदान मजसी माऊली। परमगती मज लाभो।।५४।। अंबा म्हणे मी तुजवर प्रसन्न। देईन तुजला

इच्छित वर। त्वा स्तविले मज करुन अष्टक। ते मजसी असे प्रिय।।५५।। ते अष्टक जे श्रवण पठण करती। देईन त्यांसी धनसंपत्ती। पुत्रपौत्रासह इह होतील सुखी। सायुज्य मुक्ती त्यांसी देईन।।५६।। होतील ते विद्यावान संपन्न। दीर्घायुषी ते होतील जाण। नांदतील ते सुखी होऊन। असे माझे हे प्रसाद वचन।।५७।। धन्य खरोखरी सती अनुभूती। तिये कारणे प्रगटली भगवती। मागे देवीस ती पादसेवन भक्ती। जाहली संतुष्ट जगदंबा।।५८।। अनुभूतीचे जाणून मनोगत। देवी बटु भैरवासी आज्ञा देत। म्हणे तेथे मी राहीन निश्चित। तरी तुवा तेथे जावे।।५९।। यमुना पर्वती स्थळ योजून। शीघ्र यावे तू परतून। ऐकोनी देवीचे आज्ञावचन। भैरव दक्षिण दिशेस गेला।।६०।। परी देखुन यमुनाचल वैभवास। पाहून तेथील सुवर्ण शिखरास। विसरला भैरव देवी वचनास। राहीला तेथेची बहु दिवस।।६१।। भैरव न परतला म्हणोन। घेतले देवीने तामसीचे अनुमोदन। योगिनी गहादि गणांसी घेऊन। तामसीसह देवी निघाली।।६२।। श्रीराम आला आहे पंचवटीसी। द्यावे आपण दर्शन त्यासी। उत्कंठा अति देवी मानसी। यमुनाचलास देवी आली।।६३।। भैरवा देवी भगवती विचारी। स्थळ पाहून ये सत्त्वरी। ऐसी आज्ञा होती दिधली। परंतु तू येथेची रमलासी।।६४।। यमुनाचलाची शोभा पाहून। विसरलो देवी तुझे आज्ञावचन। अपराध झाला माझ्याकडून। क्षमा करावी मज माते।।६५।। ऐकून भैरवाच्या वचनाते। ताडी हसून त्यास हस्ते। म्हणून टोळभैरव नाम तयाते। तेव्हापासून

पडियेले।।६६।। वरिष्ठ पूसती शिवशंकरासी। वरदान केव्हा दिधले रामासी। कोणते काळी यमुना पर्वती। रामासी भेटली आदिशक्ती।।६७।। शिव म्हणती देवीलीला अद्‌भूत। परम पवित्र तीनही लोकात। फार पूर्वी भृगुवंशात। घेती अवतार शिवपार्वती।।६८।। तो जमदग्नी ऋषी विख्यात। भार्या रेणुका पतिनिष्ठ। त्यांचे चार पुत्रात कनिष्ठ। षष्ठावतार तो विष्णुचा।।६९।। अधार्मिक क्षत्रिय झाले फार। भूमीसी सोसेना त्याचा भार। उतरावया भूमिभार श्रीकरधर। रेणुका उदरी अवतरला।।७०।। त्याकाळी कार्तवीर्य सहस्रार्जुन। मृगया करावया कारण। वनी हिंडता श्रमला म्हणून। जमदग्नी आश्रमी तो आला।।७१।। ऋषींनी बहुत सत्कार करुन। दिधले सर्वांसी मिष्टान्न भोजन। राजा म्हणे दुर्बळ हा ब्राह्मण। विचार मनात तो करी।।७२।। म्हणे याचे पाशी कंचे धन। राही वनी पर्णशाळा बांधून। मी स्वतः सार्वभौम नृप असून। नाही ऐसे सामर्थ्य मजपाशी।।७३।। ऐसा राजा विचार करी अंतरी। मग समजले की याचे घरी। कामधेनु पुरवी सर्व सामग्री। इच्छीले सर्व देई ती सर्वदा।।७४।। राम तेव्हा नसता आश्रमात। समिधा आणण्या गेला असता वनात। इकडे कामधेनुसी नृपनाथ। निजनगरी घेऊन गेला सैन्य हस्ती।।७५।। नंतर परशुराम आला आश्रमात। हात जोडूनी पित्यासी पूसत। म्हणे कामधेनू नसे आश्रमात। ऋषी म्हणती नेली राजाने।।७६।। ऐकूनी परशुराम कोपे भरला। बाणभाते घेऊन नगर द्वारी आला। उभा राहून बोले वचनाला। धेनू आणुनी द्या

सत्त्वरी।।७७। राजाज्ञेने वीर धावले सत्वर। आले ते परशुरामा समोर। परशुरामे केला पराक्रम घोर। सर्व वीर टाकले मारुन।।७८।। मग आला सहस्रार्जुन समोर। घेऊन दहा सहस्र कुमार। राम एकटा एकांग वीर। त्याच्यावरी समग्र सैन्य लोटले।।७९।। परशुरामाने सर्व सैन्य मारले। काही प्राण घेऊन पळाले। काही घायाळ होऊन पडीले। परशुरामे वधला कार्तवीर्य।।८०।। करुनी ऐसा महा पराक्रम। खळ दुर्जना संव्हारुन। कामधेनूसी गेला घेऊन। परशुराम आश्रमी परतला।।८१।। सहस्रार्जुन पुत्र राहीले जीवंत। करती ते शोक अत्यंत। सूड घेऊ म्हणती मनात। वधु आम्ही त्याचा पिता।।८२।। परी परशुराम जवळी असता। न साधेलकार्य तत्त्वता। जाऊ आश्रमी परशुराम नसता। म्हणूनी पाळत ठेविती ते।।८३।। जमदग्नी आणि रेणुका सती। दोघेच जेव्हा आश्रमी असती। दुर्जन आले मारावयासी। जमदग्नी वध त्यांनी केला।।८४।। रेणुका सती करी आक्रोश। धाव रे रामा त्वरीत। ऐकोनी राम धावला त्वरीत। परी पिता मुकला प्राणासी।।८५।। रेणुकादेवी महासती। अवतरली असे ती आदिशक्ती। करवूनी कार्य रामा हस्ती। पति सह गमन करी ती।।८६।। परशुराम मातेची प्रार्थना करी। तुज वाचोनी मज क्षणभरी। न होईलसुख निर्धारी। धाव लवकरी माते तू।।८७।। प्रगटली तेव्हा रेणुकादेवी। म्हणे पुत्रा तू जा येथूनी। एकवीस वार क्षत्रिय मर्दुनी। धरा भार दूर करी तू।।८८।। हे तुज योग्य नसे स्थान। येथ माझे सान्निध्य अयोग्य जाण। यास्तव महेन्द्र पर्वती

जाऊन। राही पुत्रा सुखरुप।।८९।। पुढे तुझे सातवे अवतारी। जन्मशील तू कौसल्या उदरी। रावण वधावया कारणी। तुझा अवतार होईल।।९०।। त्या अवतारी याल यमुना पर्वती। क्षुधातृषेने पीडीत व्हाल अती। फल तोय काही न मिळेल तुम्हासी। तू धरणीस छीद्र पाडशील।।९१।। तेव्हा भोगावतीचे जल आणोन। कराल तुम्ही जल प्राशन। लक्ष्मणा अंकी शिर ठेऊन। करशील निद्रा क्षमयुक्त तू।।९२।। तेव्हा मी होईन प्रगट। सीतेचे रुप धरुन करीन कपट। रामा ओळखशील माझे मातृरुप। माते म्हणूनी तू चरणी लागसी।।९३।। येईन मी हस्ती आरती घेऊन। तेव्हा जागृत राम होऊन। म्हणेल मज तू कोण सुलक्षण। मज वाटे तू वनदेवता।।९४।। पुत्रा ऐक देऊनी मन। जे मी रामचंद्रासी बोलेन। ऐसे परशुरामास संबोधून। मग रामास बोलेल जगदंबा।।९५।। हे रामा तू बोललासी जाण। त्वंकाईती म्हणोनी वचन। तरी हेची माझे नाम जाण। आजपासून होईल।।९६।। याची कारणे कलीयुगात। येथील सर्व जन समस्त। तुकाई तुकाई ऐसे म्हणत। जगदंबेसी सद्‌भावे।।९७।। यमुनापर्वती श्रीरामासी। भेटोनी जगदंबा म्हणे त्यासी। सीतावार्ता तुज सांगायासी। आले असे हया स्थळी।।९८।। सिध्दयोगी मुनी सेवीत। असे श्रेष्ठ रम्य यमुना पर्वत। श्रीरामासी भेटोनी निश्चित। राहीली तेथे जगदंबा।।९९।। जगदंबा कथा ऐसी सुरम्य खास। ऐकोनी भक्तजन पावन होत। श्रवण पठन करीता प्रसन्न त्यास। असेल सदोदीत जगदंबा।।१००।।

माय माझी गोजीरवाणी। भरते सकलसंकटांचे पाणी।।
भरुनी टाकी दु:ख सागरात। जीवन फुलवते मोहक वाटिकेत।।
प्रथम अध्याय करिता पठन। मनात होते भावन।।
सगे सोयरे सगळे नातेवाईक। गोड होऊनी ठेवती सुखात।।
।।श्री तुळजामाता चरणार्पणमस्तु।।

# अध्याय दुसरा

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमन माझे तुळजाभवानी। असशी तू रामवरदायिनी। प्रकट झालीसी अनुभूती कारणी। देवी तुळजा हो प्रसन्ना।।१।। तू साक्षात ब्रह्मरुपिणी। सकल विद्यांची तू स्वामिनी। चरित्र तव लिहिण्या कारणी। देई मती या स्वामिभक्ता।।२।। वरिष्ठमुनी पुसती शिवासी। तुळजादेवी भेटली श्रीरामासी। भेटी झाली कवणे काळासी। सांगा मजसी विस्तारुन।।३।। शिव म्हणे रावण वधावया कारण। श्रीविष्णु सप्तमावतार करी धारण। कैकयीस करुनी निमित्तकारण। करी वनवास तो चतुर्दश वर्ष।।४।। सीता लक्ष्मणासहीत येई वनात। अगस्ती वचने निवास पंचवटीत। संपूर्ण दंडकारण्यामाजी ते फिरत। निवास करती गोदातीरी।।५।। तेव्हा रावण कपटे करुन। सीतेस तो गेला घेऊन। सीतावियोगे अतिदुःखी होऊन। रामलक्ष्मण यमुनाचली आले।।६।। अतीव क्षीणले क्षुधा तृषे करुन। न मिळे जलही त्या लागुन। छीद्र पाडून आणले भोगावती जल। तृषाशमन ते करते झाले।।७।। ऐसीये परी रामलक्ष्मण हिंडता। शोधती सीतेस यमुना पर्वता। तेव्हा सीतारुप घेऊन तुळजामाता। झाली प्रकट तया समोरी।।८।। श्रीराम जाणे

नव्हे ही सीता। ही तर प्रत्यक्ष तुळजामाता। करी वंदन ठेवूनी चरणी माथा। म्हणे माते दे वर मजसी।।९।। प्रसन्न झाली तुळजा माता। म्हणे मी सांगीन तुज वार्ता। रावणे नेली तव भार्या सीता। सहाय्य तुजसी करीन मी।।१०।। श्रीरामे केला तिजसी नमस्कार। स्तवितसे तिजसी जोडोनी कर। म्हणे देवी आम्हा असावा तुझा वर। कार्यालागी सहाय्य करावे।।११।। राम म्हणे माते जगज्जननी। झालिसी तू यमुनाचल वासिनी। सेवा तुज करिती सकल योगिनी। असशी कृपाळू तू माते।।१२।। तुझे सामर्थ्य असे अपार। साक्षात शक्तीरुपा तू थोर। अंत:करण तुझे अति उदार। भक्तांचे रक्षण करीसी तू।।१३।। रामबंधु लक्ष्मण नमी तिजसी। उभय पूजिती तुळजादेवीसी। सहस्रनाम जपुनी तिज स्तविती। होई मातेसी अति आनंद।।१४।। श्री तुळजा सहस्रनाम मंत्र। याचा ऋषी श्रीराम स्वतंत्र। असे अनुष्टुप छंद पवित्र। तुळजादेवता असे जेथे।।१५।। बीजदेवी कामबीज शक्ती। असे घडसंज्ञकैकिक एकेक म्हणती। सकल कामना विनियोग निश्चिती। बोलिला असे येथ की।।१६।। करुनी अंगुष्ठादि करन्यास। तैसेच करुनी हृदयादि न्यास। एकेक देवता एकेक अंगास। मंत्र उच्चरोनी स्थापितसे।।१७।। तुरजा तमजा तीव्र जाण। भैरवी कालिका म्हणून। हे षट् देवताभिधान। क्रमे करुनी जाणावे।।१८।। म्हणूनी अंगुष्ठादि षडांगास। मंत्रोच्चारे करुनी न्यास। मग भावे करावे ध्यानास। स्थिर मानस करोनी।।१९।। परात्परा तुरजा देवी। पापनाशिनी मंगला बरवी। सगुण सौभाग्य लावण्य मिरवी। भुवन सुंदरी जगदंबा।।२०।। सर्वांगे शोभे शाम

सुंदरा। नेसली दिव्य श्वेतांबरा। दिव्य चंद्रप्रभा जैसी अंबरा। शोभावी तैसी देवी शोभत।।२१।। शोभतसे देवीचे मुखकमळ। जैसे शोभे पूर्ण चंद्रमंडळ। अतीव तेजःपुंज मूर्ती निर्मळ। वर्णने अशक्य शब्दातूनी।।२२।। अष्ट महासिध्दि की अष्टधा प्रकृती। किंवा अष्ट दिक्पाळ पंक्ती। भव्य अष्ट दिग्गज शुंडाकृती। बहु शोभती सरळ तैसे।।२३।। दिव्यायुधे तिच्या शोभती हस्ती। बाण चाप शूळ गदा मिरविती। खड्ग शंख चक्र शोभती हस्ती। भक्ता परम सुखदायक ती।।२४।। जगदेश्वरी देवी तुळजाभवानी। तियेची सहस्र नामे करुनी। वनोद्भव सकलपुष्पे वाहुनी। श्रीराम पूजा करीतसे।।२५।। शंकर म्हणती आता हो एकाग्र। सांगती तया तुळजेचे नाम सहस्र। म्हणती असे अति शुभदायक मोक्षकर। सद्भाव युक्त पठन करावे।।२६।। चतुर्थी विभक्ती लाऊन। अंती नमः शब्द उच्चारुन। प्रत्येक नामाचे करावे पठन। भक्तीपूर्वक ज्ञात्यांनी।।२७।। श्रीशंकर सांगती तुळजा सहस्रनाम। श्रीरामचंद्रे केले उत्तम। सायंकाळी द्विज उत्तम। भक्तीने पठन करीलजो।।२८।। त्याच्या सर्व मनोकामना। पूर्ण होतीलनिश्चये जाणा। नवरात्र करोनी उपोषणा। शतावृत्ती करीलजो।।२९।। रात्री प्रत्यक्ष येऊनी देवी। वांछित फलदेई बरवी। विद्याकाम जो मानवी। तेणे षण्मास पाठ करावा।।३०।। जितेंद्रिय ब्रह्मचारी। सहस्रनाम जपेलजरी। तरी लोकोत्तर विद्या निर्धारी। होईलप्राप्त तयासी।।३१।। अपुत्री होईलपुत्रवान। दरिद्री होईलधनसंपन्न। रोगी रोगमुक्त होऊन। सुखी होईलसर्वथा।।३२।।

कुष्ठरोग दद्रुरोग। क्षयोपास्मार चर्चिका रोग। पायूपस्थ व्रणादिरोग। सर्वही दोष निघून जातील।।३३।। बधिरत्वादि आणि वंध्यत्व। मूकत्व आणि पांगुलत्व। ते नासोनी जाय जडत्व। सूर्योदयी जाई तम जैसा।।३४।। देवी सन्मुख बैसोन। नित्य दशवार जो करीलपठन। त्याचे सकलेच्छित होई पूर्ण। देवादिकांसीही दुष्कर जे।।३५।। देवीसमान नाही दूसरी। विद्यावर दात्री भुवना माझारी। धर्मार्थी पावे धर्म झडकरी। कामार्थी सुखी होतसे।।३६।। धनार्थी होई धनयुक्त। धर्मार्थी पावे धर्म सम्यक। पुरश्चरण तयाने भक्तियुक्त। श्रद्धा पूर्वक करावे।।३७।। सहस्र नामाचे करावे पठन। त्या दशांशे करावे हवन। शर्करायुक्त पायसे करुन। यथाशक्ती करावे भक्तीने।।३८।। कुमारीसी द्यावे भोजन। करावे तैसेच ब्राह्मण संतर्पण। यथाशक्ती करावे सर्व जाण। मुख्य असावा श्रद्धा सद्भाव।।३९।। कुबेरा ऐसा होई धनवंत। ब्रह्मयासम होई बुध्दिवंत। होईल त्रिभुवनी विख्यात। सर्व देवांसी पूज्य होय।।४०।। येथे अधिक काय बोलावे। देवी सायुज्य लाभेल बरवे। अति शुभ फलदायक हे अवघे। सहस्रनाम असे देवीचे।।४१।। तू ही करोनी एकाग्र मन। सहस्रनाम करी पठन। सर्वही कामना होतील पूर्ण। सांगे शंकर वरिष्ठासी।।४२।। शंकर सांगे ऋषी वरिष्ठासी। श्रीरामे स्तविली पूर्ण मानसी। सहस्रनामे स्तवुनी देवीसी। घातला साष्टांग दंडवत।।४३।। श्रीराम पूजेने अंबा झाली प्रसन्न। रामलक्ष्मणासी आसनी बैसवून। उभय बंधुस आरती ओवाळून। श्रीरामास सांगे तुळजादेवी।।४४।। म्हणे अंबा त्यासी

वचन। पूर्वजन्मी इच्छिलेस मम दर्शन। ते म्या दिधले तुज दर्शन। आणिक वरदान देईन तुज।।४५।। दूर दक्षिणेस ऋष्यमुख पर्वत। असे तेथे सरोवर चंपा नामक। त्या सरोवर तीरी जा लक्ष्मणासहीत। तेथेची स्थिर राहे तू।।४६।। पाहुन तुम्हास सुग्रीव वानर नृप। होईल तो मनी भयभीत। बोलावूनी समीप अंजनीसुत। हनुमानास सांगेल तो।।४७।। वाटे मज बंधु वाली बलवंत। त्यांनीच यांना पाठविले निश्चित। तू सूक्ष्म रुप धरुन जा त्वरीत। भाव जाणून घे त्यांचा।।४८।। येईल तुम्हाकडे तो कपीश्वर। द्यावे तू तयासी उत्तर। अयोध्यानाथ दशरथ नृपवर। त्याचेच सुत आम्ही दोघे।।४९।। अगस्ती मुनींची आज्ञा पाळून। राहीले पंचवटीस बहुत दिन। परी रावण गेला सीतेस घेऊन। तिचा शोध आम्ही घेतो।।५०।। पुसावे तुम्ही मग त्या कपिसी। तू कोण कोणाचा आहेसी। मग त्याचे समग्र वृत्तांत। हनुमान तुम्हा सांगेल।।५१।। हनुमंत सांगील वाली वृत्तांत। सुग्रीव राज्य सोडून पळुन जात। माग ऋष्यमुख पर्वती येऊन। राहीला सुग्रीव निर्भय।।५२।। पूर्वी या पर्वती केले वालीने विघ्न। म्हणून मातंगी ऋषी देती शाप। जरी वाली येईल या पर्वतास। प्राणास त्याच्या मुकेल तो।।५३।। अन्यत्र आहे वालीचे भय। म्हणून सुग्रीव येथ राहे निर्भय। तो तुझा मित्र होऊन कार्य। तुझे सर्व ही करील।।५४।। तू ही उत्तर द्यावे त्यासी। कोठे सुग्रीव सांग मजसी। कैसे करील तो माझे कार्यासी। मग मारुती देईल उत्तर।।५५।। म्हणेल तो नल, नील, जांबुवंत। चौथा आहे दधिमुख विख्यात।आणि

पाचवा मी हनुमंत। आहोत आम्ही प्रधान त्याचे।।५६।। आहे सुग्रीव याच पर्वतावर। तुझी इच्छा असेल जर। भेटवीन मी तुजसी सत्वर। करील कार्य तो तुझे।।५७।। तुझे आज्ञे तो सुग्रीवाप्रत जाईल। सर्व वृत्तांत त्यासी सांगेल। मग वानरासहीत येईल। सुग्रीव तुझ्या दर्शना।।५८।। मग अग्नीसी साक्ष ठेवून। द्यावे एकमेकांसी वचन। आणि एकमेकांचे कार्य पूर्ण। तुम्ही दोघांनी करावे।।५९।। श्रीरामा मी सांगितल्या परी। सुग्रीवासी तू सख्य करी। कार्यसिध्दी तुमची होईलबरी। संकट काही न पडेल।।६०।। तू जाऊनी किष्कींधेसी। वधावे बाणे वालीसी। नंतर करावे अर्पण सुग्रीवासी। किष्कींधेचे राज्य।।६१।। सुग्रीव भार्या जी रुपवती। वालीने हीरोन घेतली होती। पुनः अर्पून तीज सुग्रीवासी। सुखी तयासी करावे।।६२।। सुग्रीव असे वानरेश्वर। त्याचे मिळवून सर्व वानर। सीतेस शोधावया सत्वर। हनुमान लंकेस जाईल।।६३।। तो परत येईललंका जाळून। तू ही क्षार समुद्रापर्यंत जाऊन। वानरा हाती सेतू बांधवून। सेतू मार्गे लंकेस जावे।।६४।। तेथे रावणचा वध करुन। सीतेस निजसवे घेऊन। बिभिषणा राज्य देऊन। या मार्गे अयोध्येसी परताल।।६५।। अंबा म्हणे श्रीरामाते। तुझे माझे अन् लक्ष्मणाचे। असेलसान्निध्य ह्या स्थानाते। लिंग दर्शने जातीलदोष।।६६।। लोकानुग्रह करिण्या कारण। तुजसहीत या पर्वती राहीन। छप्पन चौकड्या युगाच्या पूर्ण। दीन जन तारण्यास्तव।।६७।। तुझ्या तीर्थी करुनी स्नान। तुझे लिंगाचे करतीलपूजन। देव ऋषी आणि पितृयजन। जे कोणी

सद्भावे।।६८।। येथे करुनी मनुष्यांसी अन्नदान। देऊन पशुंसी तृणजीवन। ते वैकुंठासी जातीलजाण। संशय येथे असो नये।।६९।। देवी आज्ञे रामे स्थापिला रामेश्वर। लक्ष्मणे स्थापिला लक्ष्मणेश्वर। लिंगे स्थापुनी नमस्कार। देवी जगदंबेसी केला दोघांनी।।७०।। लिंग तयांनी स्थापिले पाहुनी। त्वरीत तुळजा रामवरदायिनी। रामलक्ष्मणांसी सवे घेऊनी। सत्वर तेथोनी निघाली।।७१।। येऊन रामतीर्थाच्या दक्षिण दिशी। यमुनाचलाचे शिरोभागासी। शिला विस्तीर्ण पाहून वेगेसी। त्यावरी बैसली जगदंबा।।७२।। तुळजा बैसली ज्या शिळेवर। रामासी बोलली वचन मधुर। त्या शिलेसी अजुनही सर्व नर। घाट शीळ ऐसे म्हणताती।।७३।। अंबा म्हणे आता दक्षिण दिशेसी। जाई रामा तू वेगेसी। कार्य पूर्ण होऊन निश्चयेसी। माझ्या दर्शनास येशील।।७४।। जेथे जेथे समरांगणी। संकट पडेलयेईलग्लानी। तेथे तेथे मज लागुनी। स्मरावे तू रामराया ।।७५।। मज स्मरता संकट निरसेल। जाऊन ग्लानी बळ लाभेल। विजय लक्ष्मी माळ घालील। सत्य हेच जाण रामा।।७६।। शंकर म्हणती वरिष्ठ मुनींसी। राम ऐकूनी देवी वचनासी। नमस्कार करोनी देवीसी। भावे प्रदक्षिणा घालीतसे।।७७।। देवीचा ऐसा आशीर्वाद घेऊन। निघाले सलक्ष्मण रघुनंदन। लंकेचा मार्ग समोर लक्षुन। निघाले रामलक्ष्मण लंकेकडे।।७८।। चरण चाली ते दोघे चालत। अंबा त्याकडे प्रेमे पहात। नेत्र दृष्टी लावूनी निश्चित। दिसे तोवरी रामास ती पाहे।।७९।। नंतर रम्य यमुना पर्वतावरी। तुळजा माता परमेश्वरी। राहीली आनंदे सह परिवारी। धन्य धन्य तो

गिरीश्रेष्ठ।।८०।। आता तुळजादेवीचे घर। ते होय यमुना गिरी वर। सुवर्ण वैडुर्य रत्नाचे शिखर। अनेक तयाची शोभत।।८१।। स्वर्गस्थ देवांसी समजता वृत्त। धावले सर्व देव समस्त। मनी होऊनी अति उत्कंठीत। दर्शना आले अंबेच्या।।८२।। इंद्र वन्ही यम नैॠत्य। वरुण समीर सोम रुद्र। अष्टवसु रुद्र आदित्य पितृगण। दर्शना आले अंबेच्या।।८३।। पर्वती राहीली जगदंबिका। समजले जेव्हा चतुर्मुखा। विश्वश्रेष्ठ तो स्वये देखा। दर्शना पातला अंबेच्या।।८४।। ब्रह्मा सवे जे जे आले। सर्वांनी अंबेसी नमस्कारीले। हात जोडोनी ते उभे राहीले। जगदंबेच्या सन्मुख।।८५।। अंबा पूसे ब्रह्मासी कुशल। संतोषला तेणे कमलासन। म्हणे अंबे तुझे हृदय सदय। चिंता सर्वांची तू वाहसी।।८६।। सर्वांचे व्हावे कल्याण। हेच असते तव चित्ती पूर्ण। सत्य संकल्प तुझा जाण। अन्यथा कैसा होईल।।८७।। तू तारिसी पाळिसी जयासी। दारिद्र्य दुःखे त्यासी कैसी। विघ्नापासून नसे भय त्यासी। तुझ्या वरदाना कारणे।।८८।। याकाळी राक्षस होता उन्मत्त। लोकांसी पीडिती अत्यंत। त्यांचा मग करावया घात। रामसी वर त्वा दिधला।।८९।। तू रामास वर दिधला। वधीलसंग्रामी तो रावणाला। राज्य देऊन बिभीषणाला। तुजपाशी तो येईल।।९०।। तू तारिसी सर्वांचे मूळ। तुज पासीच आम्ही सकळ। आम्हा रक्षावयासी केवळ। अनंतरुपे तू धारण करसी।।९१।। अंबे येथे तू राहीलीस म्हणून। मी देवांसह येथे राहीन। जिकडे सूर्य तिकडे किरण। राहत असती निश्चये ।।९२।। वरिष्ठ मुनी पुसती शिवासी। या

यमुनाचली वस्ती करण्यासाठी। कोणते देव अन् कोण ऋषी। यमुना पर्वती राहीले।।९३।। शिव म्हणे विरंची सह सर्व देवगण। मरीची दक्षादि ब्राह्मण। नारद सनकादिक मुनीगण। देवी जवळी सर्व आले।।९४।। विरंची म्हणे गंगादि सर्व सरिता। सकलमुनिगण आणि देवता। माझे आज्ञे राहतीलतत्त्वता। जोवरी असती शशीभानु।।९५।। शंकर म्हणे ऐक वरिष्ठा। पूर्ण मानस विश्व श्रेष्ठा। आठविता झाला शिला पृष्ठा। विश्व कर्म्यासी त्यावेळी।।९६।। स्मरता विश्वकर्मा स्वतः येऊन। देवीसी विधीसी करुनी नमन। देव मुनी सनकादिकांस वंदून। हात जोडोनी उभा ठेला।।९७।। ब्रह्मयाचे आज्ञे करुन। विश्वकर्मा स्वये आपण। प्रसाद एक करीलनिर्माण। जगदंबेसी राहण्या।।९८।। देवीचा भव्य प्रासाद पूर्ण। करील विश्वकर्मा निर्माण। तया प्रासादाचे वर्णन। पुढीलअध्यायी असेल।।९९।। ऐसिये परी तुळजाभवानी। राही येऊन यमुना पर्वती। भक्तगणांसी तारी माऊली। भक्तीने तयांचे होऊन प्रसन्न।।१००।।

करिता हा दुसरा अध्याय पठण। त्वरीत संकटांचे होई निवारण।।
दूर्वा घेऊनी उजव्या करात। पठण करीता शुद्ध चित्तात।।
दारिद्रय दूर भागोनी। लक्ष्मी राहते घरात।।
भवानी नाशवोनी दुःख। भरभरोनी देती सुख।।
।।श्री तुळजामाता चरणार्पणमस्तु।।

# अध्याय तिसरा

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री तुळजाभवानी मायमाऊली। भक्ताकारणे ती प्रकट झाली। यमुना पर्वती ती आली। श्रीरामास भेटण्याकारण। श्री राम वरदायिनी माता। निवास करी यमुना पर्वता। सर्व पितृऋषिगण देव देवता। यमुना स्थळी वस्तीस आले।।२।। मागील अध्यायी पाहीले। श्री ब्रह्मयाने विश्वकर्मास पाचारिले। प्रासाद भवन निर्मिण्या सांगितले। देवी भवानी मातेस्तव।।३।। विश्वकर्मा तेव्हा जाहला प्रगट। निर्माण करीतसे प्रासाद उत्कृष्ट। वर्णिण्या त्याचे वैभव अफाट। द्यावी मति या स्वामिभक्ता।।४।। विधीने स्मरण करता सत्वर। विश्वकर्मा प्रगट झाला भूवर। ब्रह्मा देई आज्ञा थोर। म्हणे प्रासाद निर्मिती करावी।।५।। स्थान तुवा करावे देवीचे। तैसेच शंकराचे अन् इंद्राचे। विष्णु, मी, गणेश, भैरवाचे। तैसेच योगिनींचे स्थान करावे।।६।। शंकर म्हणे, मुनी उत्तमा। आज्ञा ऐसी करिता ब्रहा। बरे म्हणोनी विश्वकर्मा। करी नमस्कार विधीसी।।७।। करी नमन तुळजा भवानीसी। दावुन मग बुध्दि कौशल्यासी। रुचावे ऐसे सुंदर स्थान देवीसी। निर्माण करीतसे विश्वकर्मा।।८।। जळ असोनी

भासतसे स्थळ। स्थळ असोनी दिसे जळ। ऐसे मायायुक्त स्थान अपूर्व। निर्माण करी विश्वकर्मा।।९।। देवीचे अग्रभागी सुरस। स्थान निर्मियले शंकरास। शिवाचे अग्नेय कोनास। स्थान विधीस्तव निर्मियले।।१०।। विधीच्या दक्षिण दिशेस। स्थान निर्मिले ब्रह्म भैरवास। ब्रह्मयाचे पूर्व दिशेस। स्थान निर्मिले विष्णुसाठी।।११।। विष्णुच्या उत्तर दिशेसी। मातंगी आणि योगिनींसी। तैसे कुर्म अष्टलोक पालांसाठी। स्थाने विश्वकर्म्याने निर्मिली।।१२।। प्रासाद पाहुनी ब्रह्मा तुष्ट। येई मग तो तुळजादेवी प्रत। म्हणे तुजस्तव प्रासाद निर्मिला निश्चित। तू चिरकाल राही येथे।।१३।। ब्रह्माची ऐसी विनंती ऐकून। स्वालयी तुळजा बैसली जाऊन। मग देवीपुढे ईश्वर आपण। स्वस्थानी जाऊनी बैसला ।।१४।। तो सिध्देश्वर नामे करुन। प्रसिध्द पावला अभिधान। लोकावरी समस्त अनुग्रह पूर्ण। करण्यालागी लवलाही।।१५।। ब्रह्मादि मग सकलदेव। आपुल्या स्थानी बैसले जाऊन। मग ब्रह्मदेवा नमन करुन। विश्वकर्मा स्वस्थानी परतला।।१६।। मग ब्रह्मा करी विचार। असावे हे तीर्थ पावनकर। कामधेनु, धेनु, कल्पवृक्ष। पारिजाताचे ही स्मरण ब्रह्मा करी।।१७।। चिंतामणिचे सकलगण। नंदनादि सर्व वनांचे स्मरण। आव्हान करी चतुरानन। देवी प्रीत्यर्थ त्या काळी।।१८।। अणिमादि सिध्दी समस्त। विधीने स्मरता पातल्या त्वरीत। देवी जगदंबेच्या दासी बहुत। करुन ठेवल्या विधीने।।१९।। ऋषी विचारती स्कंदासी। ब्रह्मयाने सकळ तीर्थे कैसी। आवाहिली सांगा

आम्हासी। स्कंद म्हणे सांगतो ऐका।।२०।। देवीस्तव ब्रह्माने घडविले मंदिर। इतर देवांस्तव स्थाने मनोहर। नंतर देवीचे अभिषेकास्तव। त्याने सर्व तीर्थ अव्हानिली।।२१।। सकलतीर्थांसी चतुरानन। करीतसे आव्हान मंत्रे करुन। तात्काळ पातली ती संपूर्ण। संक्षेपे करुन सांगतो मी।।२२।। शंकर वरिष्ठासी सांगती। गंगा यमुना अन् सरस्वती। विधीने स्मरण करता निश्चिती। पश्चिमाभिमुख होऊन आल्या।।२३।। गोदावरी, नर्मदा, कौमुदकी। तापी, महेंद्रतनया, शरयु, गंडकी। रेवा, योष्णी, कर्मनाशकी। विपाशा, शतद्रु, बाहुदा।।२४।। शोणभद्र, फालगु, नेत्रवती। गोमती, विंध्यतनया, पार्वती। वरुण, कृष्णा, वेण्या, कुमुद्गती। सावित्री, गायत्री, तिलोत्तमा।।२५।। श्रीमरथी, शुषुम्नी, चर्मण्वती। तुंगभद्रा, कावेरी, तपती। मलाप, हारिणा, भोगावती। पाताल गंगा इत्यादि।।२६।। प्रभास्थानी कोलस्थानी। जी तीर्थे असती मेदिनी। मेरु मांदार पर्वतस्थानी। पारीयात्र पर्वती जी तीर्थे असती।।२७।। असती जी हिमाचल पृष्ठावरी। जी तीर्थे असती गंधमादना वरी। विंध्य, कुकुर, सह्यगिरिवरी। मतंग पर्वती जी असती।।२८।। पृथ्वीतली जी विद्यमान असती। जी तीर्थे पाताळी राहती। जी तीर्थे असती स्वर्गावरती। गुप्त प्रगट तीर्थे सर्वही।।२९।। तितुकी तीर्थे एकत्र जाहली। एकमेकात ती मिसळली। कल्लोळासारखी ती भारली। विधी आज्ञेने तेधवा।।३०।। पूर्व पश्चिम दिशेकडून निघाली। पश्चिम दिशेसी वाहू लागली। देवीच्या सन्मुख सकल पातली। तीर्थे ती

मंगलदायक।।३१।। ब्रह्मदेवे हे सर्व अवलोकून। कल्लोळ नाम ठेविले जाण। तीर्थ असे हे त्रैलोक्य पावन। प्रसिध्द झाले लोकांत।।३२।। आणिक एक उत्तम तीर्थ। देवीच्या अग्रभागी स्थित। भूमी खणोनी कुंड करीत। चतुरानन तेधवा।।३३।। क्षीराब्धी सर्व सागरा सहित। अमृत आणि सुरा अद्‌भूत। विधीने स्थापिले त्या कुंडात। अमृतकुंड त्यासी म्हणती।।३४।। वरिष्ठ पुसती सदाशिवास। कल्लोळ तीर्थाचा काय महीमा असत। स्नान दान क्रियांचे फल समस्त। सांगावे मज कृपा करोनी।।३५।। सदाशिव म्हणती वरिष्ठा लागुनी। या तीर्थाचे महात्म्य ऐकता श्रवणी। याच्या स्मरण मात्रे करुनी। सर्व पातके नाश पावती।।३६।। या कल्लोळतीर्थी करुन स्नान। जरी असेलपातकी दारुण। होईलतो तात्काळ पावन। ऐसा महीमा कल्लोळ तीर्थाचा।।३७।। काही तीर्थे सेवेनुरुप फलदेती। काही मास सेवे नंतर देती। काही षण्मासा नंतर फलदेती। काही देती वर्षानंतर।।३८।। परी तैसे नाही हे कल्लोळ तीर्थ। स्नान मात्रेची पापमुक्त करीत। याचे गुण वर्णावया समर्थ। विधी, गुरु, मीही नसेची।।३९।। ऐसेची पावन तीर्थ धारा नाम। त्याचे महात्म्य असे उत्तम। तयाच्या स्मरण मात्रे करुन। ब्रह्मज्ञान होण्या नर योग्य होती।।४०।। आवाहन करिताच प्रजापती। गंगा यमुना अन् सरस्वती। स्वरुप धरोनी त्वरीत येती। ब्रह्मदेवा संन्निध।।४१।। कल्लोळ तीर्थाच्या उत्तरेसी। सुधा कुंडाच्या पूर्व दिशेसी। आल्या पश्चिमाभिमुख वेगेसी। देवीस अभिषेक करावया।।४२।। लोकांसी

पावन करावयासी। हे धारातीर्थ आले प्रसिध्दीसी। पापमुक्त करोनी जनांसी। सद्‌गती ते देत असे।।४३।। कल्लोळ तीर्थी करुनी स्नान। धारातीर्थी करीता स्नान। सप्त जन्माचे पाप दारुण। नाश पावती ब्रह्महत्यादि।।४४।। धारातीर्थी करुन स्नान। करिती जे अंबिकेचे पूजन। या लोकी होऊन सुखसंपन्न। अंती पावती वैकुंठ भुवन।।४५।। शिव सांगे माहात्म्य धारातीर्थाचे। वरिष्ठा तुज म्या वर्णिले साचे। आता महात्म्य सुधाकुडांचे। ऐक सांगतो तुज लागी।।४६।। सुधाकुंडाचे दर्शन स्पर्शन। पान करीता अवगाहन। तरी तो अमृत पावे पूर्ण। हे माझे भाषण सत्य सत्य।।४७।। आता ब्रह्म कुपाचा महिमा। तुज सांगतो द्विजोत्तमा। सर्व लोकात श्रेष्ठ ब्रह्मा। मी ही त्याची आज्ञा पाळतो।।४८।। ब्रह्मा निर्मित स्वालयात। ज्या दिनी देवी झाली स्थित। त्या दिनी मी पार्वती गणासहित। देवी संन्निध राहीलो।।४९।। माझे स्थानाचे अग्नेय कोनी। ब्रह्मदेवे कुप खणोनी। तो स्वये राहीला त्या स्थानी। ब्रह्मकुप नाम असे त्यासी।।५०।। ब्रह्मकुपी स्नान करुन। ब्रह्मयाचे करी जो पूजन। तो या लोकी सुख भोगून। अंती जाय ब्रह्म लोका।।५१।। धारातीर्थाचे पूर्व प्रदेशी। विष्णुतीर्थ म्हणती त्यासी। तेथे साक्षात वैकुंठ विलासी। स्वये प्रगट झाला असे।।५२।। लोकानुग्रह करावयासी। अत्रि गोत्रोट्‌भव विप्रासी। प्रसन्न होऊन देण्या वरासी। विष्णु लक्ष्मी सहित प्रगटला।।५३।। अत्रिगोत्री एक ब्राह्मण। नाम तयाचे असे गौतम। तो यमुनाचली येऊन। जगदंबा दर्शन घेता झाला।।५४।। कल्लोळ तीर्थी

स्नान करुन। केले त्याने देव ऋषी पितृ तर्पण। धारातीर्थी येऊन आपण। स्नान करी तो विधीयुक्त।।५५।। सुधाकुंडी जल प्राशून। जगदंबेच्या संन्निध येऊन। करुनी तिज साष्टांग नमन। प्रदक्षिणा त्याने घातली।।५६।। नंतर तप करावया लागुन। संकल्प करता झाला ब्राह्मण। किंचित दूर कल्लोळापासून। स्थान निर्मिले विचक्षणे ।।५७।। विष्णुमंत्र जप करुन। नासाग्री एकाग्र दृष्टी ठेवून। चरणांगुली उभा राहुन। विष्णुचिंतन तो करीतसे।।५८।। जितेंद्रिय आणि निराहारी। वायु प्राशुन तप करी। ऐसी दहा वर्षे लोटल्यावरी। जाहला प्रसन्न भगवान।।५९।। लक्ष्मी सहित विष्णु येत। वर माग त्यासी म्हणत। तो म्हणे जर असशी प्रसन्न। चित्त जडोनी राहो तव चरणी।।६०।। विष्णु म्हणे या जन्मी पुत्र पौत्र युक्त। आणि स्वजन परिवारा समवेत। यथेच्छ भोग भोगी बहुत। अंती वैकुंठास येशील सबंधु।।६१।। ब्रह्मयाच्या दिवस पर्यंत। माझे लोकी राहुन निश्चित। नंतर पुढे क्षत्रिय कुलात। जन्म घेशील गोदातीरी।।६२।। इंद्रद्युम्न नामे विख्यात। राजा तू होशील दृढव्रत। निष्कंटक राज्य करशील निश्चित। स्वधर्मे प्रजा पाळशील।।६३।। पुत्र पौत्र परिवारा सहित। परम धार्मिक योग युक्त। देहत्याग झाल्यानंतर त्वरित। माझे सायुज्य पावशील।।६४।। त्वा जे खणिले कुंड येथ। त्यासी म्हणतील विष्णुतीर्थ। त्रैलोक्य पावन सुविख्यात। पृथ्वीवरी ते होईल।।६५।। यानंतर स्कंद सांगे मुनिंसी। औदुंबर तीर्थ आहे कोठेसी। तयाची महिमा थोरवी कैसी। ऐकती मुनिजन आनंदे।।६६।।

स्कंद सांगे मुनिवर जनांस। सांगतो औदुंबर तीर्थ महात्म्य। असे देवी मंदिराचे अग्नेय कोनात। प्रसिद्ध अति ते भूवरी।।६७।। हे ब्रह्मऋषी पूजित तीर्थ। जेथे असे साक्षात उमाकांत। भैरवरुपे करुनी तीर्थ। नैऋत्य भागी आहे पै।।६८।। तेथे सर्वलोक वरदायिनी। पार्वती रमणी पिनाकपाणि। इंद्रादि सकल देव त्या स्थानी। व्यवस्थित स्थित असती।।६९।। सर्वांनी त्यांनी लोकानुग्रहार्थ। निर्मिले पावन औदुंबरतीर्थ। ज्याच्या स्नाने करुनी पुनीत। शिवसायुज्या नर जाती।।७०।। शंकर सांगे पुढील कथानक। म्हणे भोगिराज सर्वनायक। पातला जगदंबादेवी संन्निध। दुःख आपुले सांगतसे।।७१।। म्हणे रावणनुज अहिरावण। त्याने वासुकीचे स्थान भ्रष्ट करुन। घेतले छत्र सिंहासन भूषण। सर्वही त्याने हिरावूनी घेतले।।७२।। वासुकीने मग तप आरंभिले कठिण। स्वशरीराचे करुनी शोषण। श्रेष्ठ वापिका एक निर्माण। आपुले संन्निध करुनिया।।७३।। निराहार आणि जित क्रोध। जित प्राण जितेंद्रिय शुध्द। मौन धरुनी तो प्रबुध्द। देवी पूजन करीतसे।।७४।। नऊ दिवस करिता अनुष्ठान। झाली देवी त्यासी प्रसन्न। करुनी तयाचे समाधान। वर माग देवी सांगतसे।।७५।। वासुकी म्हणे रावणनुज अहिरावण। उन्मत्ते तयाने सर्व धन हरोन। नेले छत्र वाहन भूषण। राज्य हिरावून घेतले।।७६।। देवी म्हणे वासुकी महामती। आज पासुनी सहा दिवसा अंती। युध्दात लक्ष्मण अन् रघुपती। अहिरावणासी मारतील।।७७।। येथून तू घरासी जाई पर्यंत। तितुक्या काळाच्या आत।

मारील अहिरावणसी श्रीराम। लाभेल तुझे राज्य तुज।।७८।। त्वा येथे जे निर्मिले तीर्थ। ते नागतीर्थ म्हणुनी विख्यात। स्नान करुनी त्या तीर्थात। नर होतील व्याधिमुक्त।।७९।। ज्या स्त्रिया असतील दोषयुक्त। त्यांनी श्रावण शुक्लपक्षात। रविवार येईल ज्या तिथीस। तेव्हा नागतीर्थी स्नान करावे।।८०।। माध्यान्ह काळ होता सहज। वासुकी तुझे जे वंशज। कद्रु सुत सर्पराजास। सद्भावे तयांनी पूजावे।।८१।। काद्रवेय महाबलवान। त्यासी क्षमा करावी म्हणे जाण। वारंवार त्यासी प्रार्थना करुन। नमस्कार सद्भावे करावा।।८२।। म्हणावे माझा अनपत्य दोष। नासोनी करावे मन निर्दोष। ऐशा मंत्रे प्रार्थुन विशेष। नमस्कार करावा पुन्हा पुन्हा।।८३।। पूजा करुन मग नव ब्राह्मण। त्यांसी द्यावे मिष्टान्न भोजन। नंतर अवशिष्टान्नाचे करावे भोजन। नियम युक्त स्वधर्म युक्त असावे।।८४।। ऐसे व्रत आचरील जी नारी। तिज पुत्र होतील निर्धारी। नागतीर्थी जलाने मज जो पूजी। त्याचे मनोरथ मी पूर्ण करीन।।८५।। शंकर सांगती हे विप्रोत्तमा। सांगितला तुज नागतीर्थ महीमा। आता सांगतो मातंगीचा महिमा। ऐक चित्त देऊनी बा।।८६।। अंबिका देवीच्या इशान्य दिशेसी। योगिनी वृंद परिवारेसी। राहिली मातंगी नाम जिसी। तुळजा देवीच्या आज्ञेने।।८७।। नाना नैवेद्य अर्पुन पंचदिन। जो कोणी मातंगीस पूजित। त्यासी इच्छिलेले होईल प्राप्त। इह परलोकी सुख पावेल तो।।८८।। तुळजा भक्तवत्सल माऊली। यास्तव मातंगी नाम पावली। ती कथा असे गोड

चांगली। ऐक तुजसी सांगतो।।८९।। मातंग नामा राक्षसेश्वर। तेणे पीडिले सर्व सुरवर। देवांच्या स्त्रिया रत्ने अपार। घेऊन गेला पापी तो।।९०।। ऋषियाग काली घेऊन विप्ररुप। याग मंडपी तो प्रवेश करीत। ऋषिजनांसी मारुनी भक्षित। अग्निसी नासुनी टाकीतसे।।९१।। इंद्र अग्नि यम वरुण। नैऋत्य वायु सोम इशान्य। सर्वांचे अधिकार स्वतः आपण। हिरावुनी त्याने घेतले।।९२।। म्हणुन विप्र अन् सर्व सुरगण। गेले ब्रह्मदेवासी शरण। तेव्हा विधाता बोले वचन। आहे हे मज सर्व विदीत।।९३।। जावे तुम्ही जगदंबेसी शरण। करील तीच दुःख निर्मूलन। कोणी समर्थ नसे तिजवीण। वधावया त्या राक्षसा दुष्टा।।९४।। म्हणून विप्र अन् समस्त देवगण। यमुनाचली सत्वर समस्त येऊन। घालुनी अंबेसी लोटांगण। स्तवन तिचे करु लागले।।९५।। देव सर्व करुनी तिची स्तुती। भक्ती आदरे तिज पूजिती। म्हणती प्रसन्न हो भगवती। करावे आमुचे दुःख हरण।।९६।। तेव्हा जगदंबिका होई प्रसन्न। म्हणे देईन वर मागा वचन। म्हणती तेव्हा देव ऋषिगण। मांतग राक्षसे पीडिले आम्हास।।९७।। देवी म्हणे मारीन मी मातंगासी। राक्षसाधम त्या पापियासी। तुम्ही जावे स्वर्ग लोकासी। व्हावे तुम्ही निश्चिंत मन।।९८।। मग देवी आराढुनी सिंहावरी। जाती झाली पर्वतावरी। सिंहनाद उच्चरव ती करी। हाक फोडितसे बहुवस।।९९।। नादे दणाणले धरणीतल। मातंग राक्षस निघाला तत्काळ। जाहले उभयतांचे रण तुंबळ। पुढील अध्यायी होईल कथन।।१००।।

वर्णन करुनी देवीचा महिमा। तिस आळवीता वाणी ही थकती।।
आई माय जननी होऊनी। भक्तांच्या सर्व पापास मारती।।
जाळूनी पापास पुण्याचा भोग देती। कमळा समान आयुष्य ती फुलविती।।
।।श्री तुळजामाता चरणार्पणमस्तु।।

# अध्याय चवथा

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री स्वामी समर्था तव चरणी। असे माझी हीच विनवणी। तुळजामातेचा पराक्रम रणी। विवरण्या तो द्यावी मति मजसी।।१।। देवी सैन्य योगिनीं सहीत। पाहुनी राक्षस होई क्षोभित। सैन्यावरी धावला वेगात। तुंबळ युध्द माजले।।२।। देवी सहीत ऐंद्री महेश्वरी। तैसीच ब्राह्मी वाराही। कौमारी वैष्णवी नारसिंही। मातृकासह वेष्टिती देवीसी।।३।। चक्र घेऊनी आपले हातात। सर्व ही घोर रण करीत। राक्षसांसी वीरांसी मारीत। योगिनी आनंदे नाचती।।४।। सर्व राक्षस सैन्य झाले क्षीण। हयग्रीव राक्षसे हे पाहून। शरजाळे देवीसी तो विंधुन। सिंहावरी प्रहार तो करीतसे।।५।। तैसेच योगिनींवर वेगवेगळे। करीतसे तो प्रहार बळे। क्षोभिली अंबा तये वेळे। राक्षस हृदयी ती प्रहार करी।।६।। राक्षसे देवीवर शस्त्र सोडीले। शरशक्ती तीक्ष्ण भाले। देवीने वरचे वरी सर्व छेदिले। केले विरथ राक्षसासी।।७।। हुंकारे देवीने भूवरी शक्ती पाडली। राक्षस ही मग हुंकार करी। राक्षस अंतर्धान पावला पाहुनी। विस्मय देवीस होत असे।।८।। केला त्याच्या सैन्याचा नाश। आला सुंद नाम राक्षस। बाणे विंधीत

देवीसह सिंहास। योगिनींवरी तो बाण सोडी।।९।। अंबेने तयासी शस्त्रे ताडीले। बाण सोडून धनुष्य मोडीले। खड्ग ध्वज बाणभाते तोडीले। सारथ्यास त्याच्या मारीले।।१०।। सुंद येई बैसोनी अन्य रथात। देवीने मोडीले त्याचे सर्वरथ। देवीने मारीले सुंद राक्षसास। पडता तो दणाणे धरणीतळ।।११।। तोची प्रगट झाला हयग्रीव। पातला तो देवीसमोर। देवीने छेदीले त्याचे शीर। पाहुनी सुरगण आनंदला ।।१२।। हयग्रीव नी शुंभ राक्षस दोनी। भवानीने ठार मारीले रणी। हे मातंगे राक्षसे पाहुनी। देवीसी तो वचन बोलत।।१३।। स्वकीय बळाचा करीसी गर्व। तर करी मजसवे तू युध्द। तेव्हा अंबा म्हणे तुजसह युध्द। करणार नाही मी पापिया।।१४।। मज पासुनी एक शक्ती। होईल निर्माण तीच तुजप्रती। युध्द करुनी तुजला अंती। टाकील मारुनी निश्चये।।१५।। स्कंद सांगे ऋषींप्रती। तेव्हा ऐसे बोलून भगवती। स्वशरीरा पासुनी एक शक्ती। करीतसे प्रगट तेधवा।।१६।। शक्ती प्रगटली अद्‌भुत। द्विभुजा प्रचंडमुखी ती दिसत। घेऊनी आपले हाती धनुष्य। प्रचंड अट्टाहास ती करीतसे।।१७।। भयंकर भूते परिवारासहीत। मातंग राक्षसावरी धावत। पाच तीक्ष्ण बाणे त्वरीत। प्रहार करीतसे मातंगावरी।।१८।। सवेची मारीले अश्वासी। सारथी त्याचा धाडला यम सदनासी। दुर्दशा पातली मातंगासी। बाणविध्द केला शक्तीने।।१९।। राक्षसे कोपुनी त्या अवसरी। बाण सोडीले कौमारीवरी। वैष्णवी, माहेंद्री, नारसिंही वरी। वाराही वरीही तो सोडे बाण।।२०।। ऐसा

राक्षस विंधी योगिनींसी। कोपली तेणे शक्ती तुरजा देवीची। ताडी ती बाणे राक्षसासी। पतन पावला तो भूवरी।।२१।। पतन पावला राक्षसेश्वर। मातृका त्याचे सैन्य करती चूर। मग ब्राह्मी कुशोदक अभिमंत्रून। जलक्षेपण सर्वत्र करतसे।।२२।। जेथे जेथे जल बिंदू पडती। त्याची तात्काल शस्त्रे होती। राक्षसांचा ती घात करीती। राक्षस गतप्राण होती तेव्हा।।२३।। ऐसा मातृका गणाने समस्त। केला राक्षसांचा नि:पात। मातंग राक्षस होता मूर्छित। सावध होऊनी तो पाहतसे।।२४।। म्हणे मग तो तुळजाशक्तीला। माझे सैन्याचा तू घात केला। ये आता मजसवे संग्रामाला। उभी राहे तू मजपुढे।।२५।। देवी म्हणे वीर नाही बोलत। आताच तुज मारीन त्वरीत। ऐसे बोलोनी तिने शूल तीक्ष्ण। राक्षस हृदयी मारीले।।२६।। टाकुनी आपुले राक्षसरुप। झाला त्वरीत तो भुजंगरुप। देवीने मग सोडोनी। गरुडास्त्र केले तयासी बंधन।।२७।। सवेची धारण करी तो गजरुप। ताडीले देवीने त्याचे गंडस्थळ। मग सोडोनी आपुले गजरुप। पुन्हा राक्षसरुप तो झाला।।२८।। खड्ग चामर घेऊन त्वरीत। देवीच्या गजावरी तो प्रहार करीत। तेव्हा देवीने खड्गासहीत। हात तोडला राक्षसाचा।।२९।। गदा घेऊनी डाव्या हातात। देवीसी माराया तो धावत। गदेसहीत त्याचा डावा हात। देवीने तोडला तत्क्षणी।।३०।। पादघाते तो देवीस मारु पाहात। देवीने तोडीले त्याचे पाद। देवीने छेदिले राक्षसाचे शीर। देवीने मारला मातंग राक्षस।।३१।। देव ऋषिगण सर्व आनंदले। गंधर्वपती गान गाऊ लागले। मुनिगण देवीस स्तविते झाले। गर्जला सर्वत्र

जयजयकार।।३२।। देवी बोले मुनिगण अन् सर्वांसी। माझे शक्तीने मारले राक्षसासी। तैसे सूचक नाव असावे तीसी। मग शक्तीस देवी सांगे।।३३।। त्वा मारीले मातंग राक्षसासी। तरी मांतगी नाम असो तुजसी। प्रसिध्द होवो सकल लोकांसी। मातंगी नामे तुज गातील।।३४।। चैत्रमासी शुध्द अष्टमीसी। तैसेची मूळ नक्षत्री। सद्भावे जे तुज पूजिती। तया राक्षस, रोग पीडा न होय।।३५।। रोग न होईल त्या लागून। बाल - वैधव्यादि दोष गहन। बाल, स्त्री, सर्वा सुखावह पूर्ण। असेल तुझे दर्शन मातंगी।।३६।। निरोप ऐसा दिधला मातंगीसी। जावया आपले स्वस्थळासी। आपण ही मातृकासहित वेगेसी। यमुनाचळी तुळजा पातली।।३७।। स्कंद सांगे ऋषि लागून। अगणित तीर्थे परम पावन। जयांचे जल पावन गंगासम। असती तीर्थे यमुनापर्वती।।३८।। येथे साक्षात महेंद्र येऊन। झाला मुक्त पापां पासून। ऋषि विचारती पापाचरण। इंद्रने कोणते केले होते।।३९।। स्कंद म्हणे कश्यपाचा त्वष्टा सुत। त्याचा पुत्र वृत्त विख्यात। पावला असुरभाव पार्वती शापास्तव। इंद्रे तयासी रणात मारीला।।४०।। ब्रह्म हत्त्या लागली इंद्रासी। ब्रह्म देवे त्या ब्रह्म हत्त्येसी। विभागिले चार भागांसी। त्यातील एक भाग अग्निस दिला।।४१।। दुसरा जलासी, तिसरा स्त्रियांसी। वृक्षामध्ये ठेविले चौथ्यासी। स्नान देवेंद्र करी पवित्र जलासी। तेणे देवेंद्र झाला पापमुक्त।।४२।। ऐसे हे क्षेत्र पाप नाशन। असता सोमवती अमावस्या दिन। ते दिनी येथे करीता स्नान। कोटीगुणे सुकृते होतील।।४३।। ब्रह्म हत्त्यादि

पापांपासून। होईल मुक्त न लागता क्षण। स्नान मात्रेची तो होईल पावन। ऐसा थोर महिमा या तीर्थाचा।।४४।। देवीच्या पश्चिम भागासी। नृसिंह तीर्थ नाम ज्यासी। अति शुभदायक जे पाप नाशी। सर्व देवांनी सेविले जे।।४५।। येथे साक्षात स्वतः श्रीहरी। प्रल्हाद वरद तो नरहरी। वर देऊन स्व नामे करी। नृसिंह तीर्थ म्हणोनी या ।।४६।। येथे मुंडणपूर्वक करुन स्नान। जो करील पितरांचे श्राध्द तर्पण। तो शक्तींच्या लोकास जाऊन। चिरकाल वास करील तेथे।।४७।। प्राप्त झाली असता एकादशी। स्नान करुनी या तीर्थासी। निराहारी पूजील जो नरहरिसी। तो पावेल वैकुंठवासासी।।४८।। या तीर्थाच्या नैऋत्य दिशेसी। मुद्‌गल तीर्थ नाम ज्यासी। येथे मुद्‌गल पावला सिध्दिसी। श्रीशंकराचा प्रसाद त्या लाधला।।४९।। शंकराच्या आज्ञे करुन। झाले असे हे तीर्थ पावन। या तीर्थाचे स्नाने करुन। मनोरथ सर्व पूर्ण होती।।५०।। नंतर ऋषिगण स्कंदास पुसती। देवीसी पूजावयासी पद्‌धती। कोणते मासी कोणती तिथी। कोणते वारी देवीसी पूजावे।।५१।। स्कंद म्हणे अश्विन प्रतिपदा दिन। नवरात्र पूजेचे हे पर्व। ये दिवशी आरंभ करुन। पूर्वाण्ही पूजावे देवासी।।५२।। प्रतिपदे पासून नऊ दिन। नवमी पर्यंत करावे पूजन। अमावस्या विध्द प्रतिपदा जाण। वर्ज करावी पूजेसी।।५३।। प्रतिपदा नवमी मध्यवर्ती। जेव्हा येईल दिन क्षयतिथी। तेव्हा अमा प्रतिपदा संधीप्रती। शेषरात्री पूजा करावी।।५४।। होईल दिनवृध्दी निश्चिती। तरी अष्टमीसी समाप्ती। समान दिवस जरी असती। तरी नवमी समाप्ती

करावी।।५५।। सप्त मृत्तिका धान्य सप्तक। स्थापनेसी पाहीजे आवश्यक। सप्त मृत्तिकेचा विस्तृत विवेक। आधी ऐका आता सांगतो।।५६।। अश्वस्थान, गजस्थान। वाल्मिक, नदी, संगम। जलद्र राजद्वार प्रदेश जाण। सप्त मृत्तिका जाणाव्या।।५७।। मुद्ग, माष, प्रिय, गुंधी। यव, तीळ, गोधूम सप्त धान्ये ही। आम्र, उदुंबर, जांबुळ, वट ही। अशोक पंचपल्लव हे।।५८।। बहु रंगाची विविध वस्त्रे। कलश नूतन दृढअच्छिद्रे। स्थूल नूतन दीप पात्रे। अच्छिद्रे असले पाहीजे।।५९।। नऊ पदर तंतूची वाती। हस्तद्वय प्रमाण निरुती। प्रज्ज्वलीत दीप अहोराती। अखंड असला पाहीजे।।६०।। गोमूत्र, गोमय, गोक्षीर। दधी, घृत, कुशयुक्त नीर। सव्य घटकयुक्त पात्र। पृथक करोनी ठेवावे।।६१।। घृत, दुग्ध, दधि, शर्करा, मध। हे पंचामृत पूजेसी प्रसिध्द। वेगळाले पात्री शुध्द। संपादुनी ठेवावे।।६२।। देवी यंत्र सुवर्णाचे। रजत किंवा ताम्राचे। पत्रावरी लेखन साचे। अथवा भूर्ज पत्रावरी।।६३।। कस्तुरी किंवा अष्ट गंधाने। यंत्र शास्त्राधाराप्रमाणे। लेखन करावे ज्ञात्याने। सर्व सिध्दि वर प्रदायक।।६४।। कल्लोळ जळी करुनी स्नान। करावे शुभ्र वस्त्र परिधान। जितेंद्रिय होऊन पूजन। गुरु दर्शित मार्गे करावे।।६५।। ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र। हे मुख्य वर्ण चार। याहून संकर जाती इतर। सर्वांसी पूज्य जगदंबा।।६६।। पुष्प, धूप, नैवेद्य अर्पण। करुनी जगदंबेचे पूजन। स्तुतिस्तोत्र मंत्र पठण। उत्थापन मंत्रे करुन।।६७।। सर्व जगाच्या हितालागी। अंबे जागृत होई वेगी। जगच्चक्र जे चालविती

अंगी। त्या देवांच्या शक्ती रक्षिसी।।६८।। तरी अंबे जागृत होऊन। सर्वांचेच करी रक्षण। ऐसे मंत्रस्तुतिने जागृत करुन। सिंहासनी अंबा बैसवावी।।६९।। उषःकाली पौर्णिमेसी। पूजोनिया जगदंबेसी। बलिदान देऊन महापूजेसी। पुन्हा करावे विस्तारे।।७०।। ऐसे पूजावे पौर्णिमेसी। पुन्हा अश्विन कृष्ण अष्टमीसी। पंचामृत घालोनी देवीसी। वस्त्रालंकार समर्पावे।।७१।। अश्विन कृष्ण चतुर्दशी। पूर्ववत पूजावे अंबिकेसी। ऐसे पूजन अश्विनमासी। करीता फल अनंत असे।।७२।। कृत्तिका नक्षत्र शिवयोग युक्त। कार्तिक पौर्णिमा झालीया प्राप्त। विशेष असे हा पर्वकाळ। देवी जगदंबेच्या पूजेसाठी।।७३।। प्रतिवर्षी कार्तिक पौर्णिमेसी। भावे पूजावे जगदंबेसी। पूजा द्रव्य मेळवूनी प्रयत्नेसी। भक्तिभावे करावे पूजन।।७४।। मार्गशिर्ष मास झालिया प्राप्त। अष्टमीसी पूजावे देवीप्रत। देवीच्या उत्तरभागी स्थित। श्री मल्हारी देव असे जो।।७५।। त्याचे पूजन करावे षष्ठीसी। चंपाषष्ठी म्हणती त्या तिथीसी। शिव अवतार मल्हारीसी। सद्‌भाव युक्त होऊन पूजावे।।७६।। धत्तुर, पुष्पे, बिल्वपत्रे अर्पून। शुभ्र अक्षता अर्पण करुन। धूप, दीप इत्यादि समर्पून। नारिकेल फळ त्यासी अर्पावे।।७७।। नाना भक्ष्य नैवेद्य अर्पून। ब्राह्मणासी द्यावे वायन। यथा रूची मग घालावे भोजन। श्री मल्हारीदेवा प्रीत्यर्थ।।७८।। व्यासोक्त मल्हारी महात्म्य पाहता। त्यात पायसे नैवेद्य वर्णिला तत्वता। भरीत, रोटी, पलांडूची वार्ता। वर्णिली नाही किंचित तेथे।।७९।। सात्विक पूजा, सात्विक उपचार। देव अन्

देवीसी होतसे प्रियकर। स्वधर्मनिष्ठ असे जो नर। तोची आवडे देवी मातेसी।।८०।। मल्हारी पूजा झालिया जाण। जगदंबेचे करावे अर्चन। नवरात्र पद्धती प्रमाणे जाण। देवी परमेश्वरीसी पूजावे।।८१।। नंतर पौष मास झालिया प्राप्त। शुध्द सप्तमी दिवसी व्रत। कल्लोळी तीर्थी करुनी स्नान। शाकंभरीसी पूजावे।।८२।। प्रातःकाली करावे पूजन। नियम, व्रत, संकल्प करुन। पौर्णिमे पर्यंत भावे पूजन। सतत करावे अंबेचे।।८३।। दिवसी नियम नेम धरुन। वर्ज्य करावे शाक भक्षण। चतुर्दशीचे निशी जाण। पुन्हा पूजावे देवीमातेसी।।८४।। पुन्हा पौर्णिमेसी अनेक शाका। अर्पून पूजावी जगदंबिका। ब्राह्मण, सुवासिनी, कुमारिका। बहुतांसी भोजन घालावे।।८५।। माघ शुक्ल सप्तमी सूर्योदयी जाण। विष्णु तीर्थाचे करावे स्नान। नंतर सूर्याचे करावे पूजन। तांदूळ, अक्षता, रक्तचंदने।।८६।। माघ शुक्ल पौर्णिमेसी। अक्षता, पुष्पे पूजावे देवीसी। गुडोदान पायसान्न भोजनासी। ब्राह्मणासी अर्पण करावे।।८७।। तेणे ब्रह्म हत्त्यादि जाती जळून। दारिद्र्य दोषही जाय निघून। माघ कृष्ण चतुर्दशी जाण। शिवरात्री म्हणती जी लागी।।८८।। ते दिवशी करोनी उपोषण। रात्रौ सिध्देश्वराचे करावे पूजन। बिल्व, धत्तुर, पुष्प अर्पून। जागर, दीपदान करावे।।८९।। फाल्गुन मासाची झाल्या प्राप्ती। फाल्गुन कृष्ण अष्टमी तिथी। अष्टोत्तर प्रदक्षिणा भावे करुनी। जगदंबेचे पूजन करावे।।९०।। चैत्रमास झालिया प्राप्त। नवरात्र करावे पूर्ववत। यथाशक्ती आणि निष्ठावंत। पूजा करावी नित्यशः।।९१।। चैत्र शुध्द

नवमीसी। पुनर्वसू नक्षत्री विशेषी। मध्यगत सूर्य माध्यान्हासी। श्रीरामाचा झाला अवतार।।९२।। राम, भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न। दशरथ कौसल्यादि माता तीन। परिवारा सहित श्रीराम पूजन। रामतीर्थी करावे ।।९३।। रामतीर्थी करुनी स्नान। श्रीरामाचे करावे पूजन। रामवरदायिनीचे ही पूजन। पुन्हा सद्‌भावे करावे।।९४।। विधीयुक्त करुनी उपोषण। करावे व्रत विसर्जन। ब्राह्मण, सुवासिनी, कन्या भोजन। यथाशक्ती करावे।।९५।। तो जाईल राम सायुज्यासी। संशय न धरावा मानसी। शंकर सांगे वरिष्ठासी। ऐका पुढे कर्तव्य जे।।९६।। चैत्र कृष्ण अष्टमीसी। पूजावे भावे टोळ भैरवासी। जगदंबे मानिला पुत्र यासी। म्हणूनी नाना उपचारे पूजावे।।९७।। पूजकासी सर्व सिध्दी प्राप्ती। जय सर्वत्र तो पावे निश्चिती। चिंतीले मनोरथ पूर्ण होती। पातके जळती सर्वही ।।९८।। वैशाख मास तृतीया तिथीसी। देवीच्या नैऋत्य दिशेसी। रेणुके सहीत परशुरामासी। भक्तिभावे पूजावे।।९९।। तो हा बाण धनुर्धारी। भृगुवंशाची कीर्ति उभारी। त्याचे पूजेने निर्धारी। वैकुंठ प्राप्ती होत असे।।१००।।

पठण करीता चौथा अध्याय। अज्ञान्यास ज्ञान भरविती।।
नाशवूनी दुर्भाग्यास। सुभाग्यात सुखाने लोळविती।।
मिरवोनी भक्तिचा मेवा। दाविती अभयाचा ठेवा।।
।।श्री तुळजामाता चरणार्पणमस्तु।।

## अध्याय पाचवा

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

स्वामी समर्था गुरुराया। द्यावी मति भक्ताला या। चालविण्या पुढे ग्रंथासी या। व्हावे प्रसन्न स्वामी मजवरी।।१।। शंकर सांगे वरिष्ठ मुनींसी। केव्हा केव्हा पूजावे देवीसी। सांगतसे संपूर्ण पूजा विधिसी। वर्णितो आता पुढील कथन।।२।। वैशाख शुक्ल चतुर्दशी। नरसिंह जयंती म्हणती तिसी। प्रथम स्नान करुन नरसिंह तीर्थी। षोडशोपचारे करावे नरसिंह पूजन।।३।। रात्री देवीचे करावे पूजन। तेणे देहाचा ईश्वर होऊन। वैकुण्ठ लोकी होईल विराजमान। सुख संपन्नता ही लाभेल।।४।। पुन्हा ज्येष्ठ मासी पौर्णिमेसी। सुरा मासे पूजिती मातंगीसी। विपुल लक्ष्मी लाभे तयासी। जाई अंती शिव पदास।।५।। आषाढकृष्ण नवमीसी। भावे पूजावे श्री दत्तात्रेयासी। जो योगेश्वर पूर्व प्रदेशी। तुळजादेवीच्या तो वसतसे।।६।। षोडशोपचारे करावे पूजन। नैवेद्या द्यावे गुडोदन। करावी स्तुती कर जोडून। 'जय योगिराज परब्रह्म' म्हणावे।।७।। या लोकी होईल तो धन्य। विद्यावान आणि धनसंपन्न। श्री दत्तात्रेय प्रसादे करुन। सुखसंपन्न तो होईल।।८।। श्रावणमासी शुद्ध पंचमीस। करावे

विधियुक्त नागपूजन। भक्तिभावे जो करीलनागपूजन। नागलोक प्राप्त होईलत्यासी।।९।। श्रावण मासी प्रत्येक सोमवारी। सिध्देश्वर पूजावा नीशि समयी। करुन स्नान मुद्‌गल तीर्थी। पूजावा तैसाच मुद्‌गलेश्वर।।१०।। प्रति सोमवारी करावे नक्त व्रत। सायंसमयी करावे शिवपूजन। अतिशय पवित्रतम होऊन। अंती लाभतसे शिवलोक।।११।। श्रावण शुक्लचतुर्दशी दिवशी। भक्तिभावे पूजावे जगदंबेसी। तेणे अनेक सुखभोग त्यासी। नि:संशय लाभतील।।१२।। पौर्णिमेसी प्रातः धारातीर्थी स्नान। सूर्योदयी घ्यावे जगदंबा दर्शन। करावे यथाशक्ती देवी पूजन। सर्व कामना होती पूर्ण।।१३।। दत्तात्रेय समीपस्थ गणनाथ। त्यासी पूजावे भक्तियुक्त। अर्पून दुर्वा, शमी, जपापुष्प। अर्पण करावे धूपदीप।।१४।। नैवेद्यासी समर्पावे मोदक। भक्ष भोज्य आणि लड्‌डुक। फल तांबुल दक्षणा सम्यक। प्रदक्षिणा पूर्वक नमस्कार करावा।।१५।। भाद्रपद पौर्णिमेच्या दिवशी। पूजावे भक्तिभावे श्री जगदंबेसी। भक्ष्य भोज्य नैवद्य तिजसी। अर्पण करुन नमस्कार करावा।।१६।। देवीसी निरांजन ओवाळून। नऊ प्रदक्षिणा भावे घालून। नऊ नमस्कार तिज करुन। संतोषविता मनोरथ सिध्द होती।।१७।। ऐसे मासानुरोधे करुन। करावे जगदंबिका पूजन। त्याचे इच्छित होईल पूर्ण। सांगती सदाशिव वरिष्ठासी।।१८।। शंकरे वरिष्ठासी जे निवेदिले। तेची शिवनंदने मुनींस कथिले। तेणे सांगितला यात्रा विधी आदरे। जेणे मनोरथ पूर्ण होती।।१९।। प्रथम कामना उद्देश करुन। करावे ब्राह्मण संतर्पण। भावे भक्तियुक्त होऊन। करावा संकल्प यात्रेचा।।२०।। देवी

प्रतिमा जी असे घरात। बसवावी ती शिबिकेत। छत्र, चामर, यष्टि, ध्वज समवेत। करावा शब्दघोष जयजयकार।।२१।। प्रातःकाली करोनी पूजन। गीत नृत्य देवी चिंतन। हळुहळु मार्गी चालावे जाण। मध्यान्ह कालपर्यंत।।२२।। दिवस येताच माध्यान्ह। शुचिर्भूत पाहून स्थान। तेथेची मग निवास करुन। माध्यान्ह स्नानादि करावे।।२३।। करुनी संध्या जप तर्पण। जगदंबेचे करुनी पूजन। नंतर करुनी पंच महायज्ञ। भोजन त्यानंतर करावे।।२४।। सायंकाली धूप दीप अर्पून। करावे सायं संध्या पूजन। नंतर निद्रा नेमस्त करुन। उषःकाली जागृत व्हावे।।२५।। करावी संध्या प्रातःस्नान करुन। करावे भक्तिभावे देवी पूजन। त्रिकालसंध्येचे असावे एक स्थान। मग व्हावे मार्गस्थ।।२६।। आलस्य रहीत असावे नेमस्त। मार्ग क्रमोनी यमुना पर्वत। शिबिकारुट मूर्ती समवेत। समारंभ पूर्वक करावे गमन।।२७।। देवीचा करीत जयजयकार। यावे कल्लोळ तीर्था पर्यंत। तेथे ठेवून शिबिका स्थिर। साष्टांग नमस्कार करावा।।२८।। कल्लोळ तीर्थी करावे स्नान। नंतर करावे धारातीर्थी स्नान। घ्यावे मग जगदंबेचे दर्शन। करावे पूजन यथामति।।२९।। सिध्देश्वराचे मग घ्यावे दर्शन। करावे भैरव मातंगी दर्शन। भावे करुनी तयांसी नमन। निवास स्थाना प्रत जावे।।३०।। उपोषण करावे ते दिनी। पुन्हा प्रभाती दुसरे दिनी। कल्लोळ तीर्थी स्नान करुनी। पूर्वाह्णिक सर्व करावे।।३१।। नंतर करावे देवीचे पूजन। पंचामृताचे घालावे तिज स्नान। शुध्दोदके करावा अभिषेक। देवीसी मग भक्तिभावे।।३२।। तिज वस्त्रालंकार चंदन अर्पून। करावे केशर कुंकुम हरिद्रालेपन। अक्षता आणि

पुष्पमाळा अर्पून। धूप दीप नैवेद्य करावा।।३३।। नंतर करावे ब्राह्मण संतर्पण। सुवासिनी कुमारिका भोजन। मग समवेत आप्त बंधुजन। आनंदे भोजन करावे।।३४।। रात्री प्रदोष समयी जाण। नवसंख्या दीपिका प्रज्ज्वलन। गीत वाद्ये गजर करुन। रात्री जागर करावा।।३५।। प्रातःकाली पुन्हा देवीचे पूजन। करावी प्रार्थना देवी लागुन। म्हणावे आमुची अंतगृह यात्रा पूर्ण। व्हावी जगदंबे तुझ्या कृपे।।३६।। मग करावे सिध्देश्वरास नमन। ब्रह्म कुपात करावे स्नान। नंतर सुधा कुंडी करुन स्नान। देव ऋषी पितृ तर्पण करावे।।३७।। मातंग कुंडी करुनी स्नान। करावे मांतगी देवीस वंदन। कल्लोळ तीर्थी करुनी स्नान। तर्पण करावे विधियुक्त।।३८।। तेथून जावे धारातीर्थी। स्नान तर्पण करावे पूर्वरीती। मग जावे विष्णु तीर्थासी। स्नान विधियुक्त करावे तेथे।।३९।। नंतर पुजावे महा विष्णुसी। जावे तेथूनी रामतीर्थासी। रामकुंडी करुन स्नानासी। राम लक्ष्मण पूजन करावे।।४०।। करावे रामवरदायिनीचे पूजन। मग पापनाशन तीर्थी जाऊन। करुनी पूर्ववत स्नान तर्पण। औदुंबर तीर्थी जावे।।४१।। औदुंबर तीर्थी करुन स्नान। करावे कालभैरव पूजन। मग नागधारा तीर्थी स्नान। करुन टोळ भैरवासी पूजावे।।४२।। जावे मग घाट शिळेप्रती। करावे वंदन देवी पादुकांसी। मग स्नान करुन मुद्‌गल तीर्थी। मुद्‌गलेश्वरासी पूजावे।।४३।। तेथूनी जावे नृसिंह तीर्थासी। करावे तेथे स्नान तर्पणादि विधी। यावे मग जगदंबा मंदिरासी। निरांजन आरती करावी।।४४।। ऐसी करावी अंतर्गृह यात्रा। शिव सांगे मुनी वरिष्ठा। व्हावे कृतकृत्य करुनी यात्रा। होईल प्रसन्न तुळजादेवी।।४५।। स्कंद

हे सांगे सर्व ऋषींसी। जे शंकरे सांगितले वरिष्ठासी। नागतीर्थ महिमा तैसाची। जो सदाशिवे केला कथन।।४६।। नागतीर्थ असे यमुना पर्वती। विख्यात आहे हे त्रिजगती। या तीर्थी जे स्नान करिती। जाती ते तरुन विपत्तींसी।।४७।। बंधु अन् द्रौपदी सहीत युधिष्ठिर। असती लोमेश ऋषी समवेत। यात्रा करत असता अकस्मात। नागतीर्थी तो आला।।४८।। लोमेश ऋषींशी तो पुसत। सांगावा नागतीर्थ वृत्तांत। ऋषी मोदे तयासी सांगत। नागतीर्थाचे महात्म्य।।४९।। पूर्वी कृतयुगी सोमवंशात। बिल्व नाम राजा विख्यात। तो यमुनाचली असे राहात। करीतसे पालन पृथ्वीचे।।५०।। राजा एकदा गेला अरण्यात। तेथे मृग हरणीसवे होता क्रीडत। त्यावरी राजा सोडी सायक। घेतला प्राण त्याने मृगाचा।।५१।। मृग देतसे शाप नृपा लागुनी। म्हणे केलीसी तू ऐसी करणी। न लाभेल स्त्री सुख तुज लागुनी। रात्री कृमीमय होईल शरीर।।५२।। राजा झाला अति दुःखीत। सांगे शापवाणी पत्नीस। रात्री शरीर होई कृमीमय। राणी बैसे कृमी रक्षित।।५३।। दिवसा राजा असे दृढशरीर। परी रात्री शरीर कृमीमय। पुन्हा एकदा तो नृपवर। मृगयार्थ गेला वनात।।५४।। मृगया करता शिणला बहुत। क्षुधा तृषेने तो झाला व्याप्त। सेवकांसी आपुल्या आज्ञा देत। जाऊनी जल आणा म्हणोनी।।५५।। सेवक शोध घेती चहुकडे। परी जल कोठेही त्यांसी नाढळे। तितुक्यात अल्प जल सेवके देखिले। गोष्पद मात्र संचले होते।।५६।। युक्तीने तयाने ते पात्रात घातले। होऊन आला तो राजाकडे। राजाने ते किंचित नेत्रास लावले। चुबुक मात्र ते मुखी घातले।।५७।। परतला राजा स्वनगरासी। येऊन घरी

करी भोजनासी। ऐसे होता प्राप्त झाली निशी। पर्यंका वरी राजा शयन करी।।५८।। त्याची भार्या बैसली तेथ। होती ती नृपशरीर रक्षित। तिने एक देखिले अद्‌भूत। आश्चर्य चकीत झाली ती।।५९।। रात्री राजशरीर होई कृमीभूत। परी मुख नेत्र दोनी हस्त। होते तैसेची ते पूर्ववत। कृमीभूत ते झाले नाही।।६०।। राज पत्नी सकाळी राजास पूसे। तुम्ही वनात गेला कुणीकडे। काही अपूर्व आपण पाहीले। औषध अथवा अन्य काही।।६१।। राजा पूसे मग तिजसी। कोणता हेतू असे चित्ती। राजपत्नी सांगतसे त्यासी। मौन होई राजा त्या काळी।।६२।। मग राजपत्नी सेवका पुसत। काल तुम्ही सर्व गेला वनांत। तेथे काय घडला वृत्तांत। सांगावा मज लवलाही।।६३।। मग त्या सेवकातील एक। देई राजपत्नीस उत्तर। नृपासी लागली तृषा फार। उदक आणोनी म्या दिधले।।६४।। मग सेवकास घेऊन राजपत्नी। सवेची गेली त्या स्थानी। भरीले तिने ते जल घटात युक्ती। निजगृहास ती शीघ्र परतली।।६५।। मग त्या उदकाने नृपासी। घाली स्नान ती त्वरेसी। तेणे नृप कृमी रहीत तेजो राशी। दिव्य शरीर युक्त झाला।।६६।। रात्री समयी मग पर्यंकावर। शयन करीतसे नृपवर। राहीले कृमीरहीत दिव्य शरीर। पाहोनी चंद्रावती राणी संतोषली।।६७।। राजासी आश्चर्य झाले फार। भार्ये सह ते स्थानी आला नृपवर। जलाशय विस्तीर्ण करु म्हणत। तोची झाली आकाशवाणी।।६८।। ‘‘जेणे मस्तकी धरली धरणी। तो नागराज शेष फणी। तेणे निर्मिले हे तीर्थ मेदिनी। नागतीर्थ म्हणती यास्तव।।६९।। नृपा त्वा येथे एक करावे। नागेश्वर नामे लिंग स्थापावे। तेणे हे स्थान लोकात बरवे।

प्रख्यात होईल राजेंद्रा'' ।।७०।। जे या नागतीर्थी स्नान करिती। त्यांचे रोग व्याधी नाशती। ते या लोकी आरोग्यवंत होती। अंती जाती स्वर्गाप्रती।।७१।। पुढे युधिष्ठिरा सांगती लोमेश। पूर्वी श्रीराम आणि लक्ष्मण। रावणासी रणी जिंकुन। जानकी सहीत परतले।।७२।। सीता, श्रीराम आणि लक्ष्मण। पुष्पक विमानी बैसून। येऊन येथे नागतीर्थी स्नान। करुनी गेले अयोध्येसी।।७३।। तैसी बहुत तीर्थे आहेत। परी ती सोडोनी रघुनाथ। सीतेसह येती नागतीर्थास। कारण याचे मी सांगतो।।७४।। रावण वधावया साचार। झाला महाविष्णूचा अवतार। शेष तोच असे लक्ष्मण। लक्ष्मीच सीता होऊन प्रगटली।।७५।। पंचवटीस ते येऊन राहीले। रावणे सीतेचे हरण केले। वनोवनी मग हिंडू लागले। सीतेस शोधीत रामलक्ष्मण।।७६।। अकस्मात आले यमुना पर्वती। त्यांसी भेटली श्रीभगवती। सांगे ती उपाय सीता प्राप्तीसाठी। नागतीर्थ महत्त्व ही ती सांगे।।७७।। अष्ट तीर्थ परिवारात। परम श्रेष्ठ असे नागतीर्थ। येथे स्नान करिता मनोगत। होती सफळ सर्वांचे।।७८।। अष्ट तीर्थे कोण कोण। त्यांची नामे आता सांगेन। प्रथम असे नागतीर्थ जाण। नृसिंह तीर्थ असे दूसरे।।७९।। तिसरे सर्वतीर्थ, चौथे मैराळ तीर्थ। पाचवे मुद्‌गल सहावे भैरवतीर्थ। सातवे विष्णुतीर्थ आठवे लघुतीर्थ। स्नान करावे या अष्ट तीर्थी।।८०।। देवी रामास तीर्थ महात्म्य सांगत। म्हणे स्नाना योग्य अष्ट तीर्थ। ऐकून अष्ट तीर्थांचे महात्म्य। झाला राम भक्ती युक्त।।८१।। राम म्हणे व्हावी इच्छा फलीत। येईन येथे मी सीते सहित। करीन भक्तीने स्नानादिक। संकल्प मनी तो करीतसे।।८२।। लक्ष्मणासह लंकेस गेले

श्रीराम। तेथे रणी रावणा मारुन। मग सीतेसी सवे घेऊन। पुष्पक विमानी ते बैसले।।८३।। प्रथम आले शैल्यपर्वती। मल्लिकार्जुनास पुजुनी निश्चिती। तेथोनी निघाले सत्वर गती। नाग तीर्थाप्रती निघाले।।८४।। रामाचे जाणुन मनोगत। जगदंबा आली तया सन्मुख। रामावरी तिचे प्रेम बहुत। पुत्रस्नेहे पाही रामासी।।८५।। रामही मग लक्ष्मण सीते सहित। भूतळी तेव्हा उतरत। करी देवीस साष्टांग दंडवत। जगदंबा प्रसन्न होतसे।।८६।। देवी सहीत मग विमानी बैसुन। नागतीर्थासी पातले सर्वजण। तेव्हा तेथेही जगदंबा सगुण। बहु देवांसहीत पाहीली।।८७।। अनंत रुपे अनंत मूर्ती। जगदंबा असे सर्वत्र निश्चिती। श्रीराम देवी सहीत नागतीर्थी। सीते सहीत स्नान करीता झाला ।।८८।। श्रीरामे स्वनामे लिंग स्थापून। तयाचे भक्तीने करुन पूजन। जगदंबेची मग आज्ञा घेऊन। त्वरीत गेला अयोध्येसी।।८९।। लोमेश सांगती धर्मराजास। रामे स्थापिले लिंग येथ। यास्तव रामनाम बहु विख्यात। झाले असे धर्मराया।।९०।। धर्मराया तू ही बंधू भार्ये सहित। स्नान, दान करी या तीर्थात। देव ऋषी पितृ तर्पण त्वरीत। करी तू ही ब्राह्मण भोजन।।९१।। लोमेश ऋषींचे वचन ऐकून। धर्मराजे नागतीर्थी स्नान। बंधु भार्ये सहीत करुन। करी पूजन तो जगदंबेचे।।९२।। करी तो नागेश रामेश पूजन। देवादिकांचे तो करी तर्पण। दिधले त्याने ब्राह्मणांसी भोजन। तेथूनी गेला तो शैल पर्वता।।९३।। स्कंद सांगे सर्व ऋषीं प्रती। श्रावण शुक्ल पंचमी तिथी। जे गोष्पद नागतीर्थी स्नान करती। स्नान मात्रे होती कृतार्थ ते।।९४।। पूर्व कर्मास्तव कारणे निश्चित। नाना व्याधीने झाला ग्रस्त।

तरी पाच दिन नागतीर्थात। स्नाने आरोग्यवंत होईल तो।।९५।। जी स्त्री तीन सप्तक पर्यंत। स्नान करोनी नागतीर्थात। अंबा, नागेश, भैरवासी पूजीत। पुत्र पौत्रवती होईल ती।।९६।। होईल विद्यावान कुलसंपन्न। धनाढ्य पुत्र होय सगुण। अपुत्री पुरुष करील स्नान। एकवीस दिवस पर्यंत।।९७।। या तीर्थाचे करिती स्नान, पान। निष्पाप होती मानवगण। अंती सायुज्य पावे जाण। विष्णु लोकी पूज्य होईल।।९८।। शंकर सांगती वरिष्ठ मुनींस। सांगितला नागतीर्थ महिमा तुज। गंगा जला समान असे हे नीर। नागतीर्थ असे प्रख्यात।।९९।। तीर्थ महात्म्य उत्तम भक्ती। श्रवण करती आणि करविती। उभयतांसी विष्णु सायुज्य प्राप्ती। होईल जाणा निश्चये।।१००।।

पंचम अध्याय पठण करीता। दीन भक्तास देती निडरता।।
जरी शत्रु असूनी बलाढय। देती जादू टोण्याचा मार।।
नाशवूनी समूळ त्या भयास। शत्रु बुद्धी करीसी ठार।।
।।श्री तुळजामाता चरणार्पणमस्तु।।

# अध्याय सहावा

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

तुळजाभवानी देवी भगवती। भक्तांसाठी आली यमुनापर्वती। तिचे भावे स्मरण करता चित्ती। होती सफल मनोरथ।।१।। रामवरदायिनी माता देवी। मनोकामना भक्तांच्या पुरवी। यमुना पर्वती सर्व देवांसह राही। पुरविण्या भक्त मनोकामना।।२।। तुळजा भवानी महात्म्य पवित्र। उतरविण्या ते नवशतीत। देती स्वामी मज सामर्थ्य। अखंड शरण मी त्यांचे चरणी।।३।। यमुना पर्वती असती अष्ट तीर्थ। त्यातीलच एक नागतीर्थ। नागतीर्थाचा महिमा अद्‌भूत। केला वर्णन गताध्यायी।।४।। पुढे चालविण्या महिमा कथानक। द्यावी मति वर्णिण्या ते सकल। स्वामी समर्था मी आपला दास। द्यावे वरदान मजसी आता।।५।। सदाशिव वर्णन करती महात्म्य। ऐकती भावे मुनि वरिष्ठ। जे शंकर सांगती मुनि वरिष्ठास। स्कंद वर्णुन सांगे मुनींसी।।६।। देवी मंदिरापाशी समीप। असे सुंदर रेणुका भवन। तेथे वसे साचार साक्षात। तु तुरजा देवी महन्मंगला।।७।। रामभार्या जनक नंदिनी। तिने प्रार्थिली आदि भवानी। यास्तव योगिनी समुदाय घेऊनी। ते स्थळी राहीली जगदंबा।।८।। वरिष्ठ

विचारती पिनाक पाणी। कोणते काळी जनक नंदिनी। किमर्थ प्रार्थना मनसी करोनी। जगदंबेसी तिने पाचारिले।।९।। शंकर म्हणे वरिष्ठ मुनी। श्रीरामराये लंकेस जाऊनी। रावणास शौर्ये मारुनी रणी। बंध मुक्त केले सीतेसी।।१०।। नंतर बिभिषणा राज्य देऊनी। पुष्पक विमानी बैसोनी। सीतेसहित मग कोदंडपाणी। अयोध्ये प्रति ते निघाले।।११।। जगदंबा प्रसादे संकटे टळली। म्हणोनी जगदंबेस भेटोनी। जावे नंतर अयोध्ये लागुनी। ऐसे असे श्रीराम मनोगत।।१२।। ऐकोनी जगदंबे विषयी मात। सीतेस उत्कंठा लागली बहुत। अंतरी मनी ती जगदंबेसी ध्यात। देई दर्शन ऐसे विनवितसे।।१३।। पुष्पक विमानी सीतेसह रघुनाथ। सन्मुख तयांचे वायुसुत। छत्र धरितसे सुमित्रा सुत। आकाश मार्गे ते निघाले ।।१४।। विमान ऐसे अंतरिक्ष गत। आले तुळजापुर प्रदेशात। साक्षात जगदंबा त्वरित। सन्मुख धावोनी येई तेधवा।।१५।। जगदंबेसी ऐसे अवलोकुनी। श्रीरामा सहीत खाली उतरोनी। जनक नंदिनी पुढे आली। देवी चरणी ती वंदन करितसे।।१६।। जगदंबा झाली अति प्रसन्न। सीतेसी उठवून देई आलिंगन। सीतेस म्हणे भगवती धन्य। राम हर्ष प्रवर्धनी तू असशी।।१७।। तुझ्या सौभाग्य योगे करुन। झाला मुक्त राम संकटातून। आता रामासह सर्वजण। सुखाने जावे अयोध्येसी।।१८।। तिने सीतेस दिधले वस्त्रालंकार। म्हणे सुखाचा तू घेई भोग। पुत्र लाभेल तुज सुभग। देवीने सीतेसी गौरविले।।१९।। या स्थळी भेटली देवी सीतेसी। यास्तव हे स्थान प्रिय जगदंबेसी। अखंड वास्तव्य

झाले ते देवीसी। म्हणूनी हे स्थान प्रसिध्द असे।।२०।। कार्तिक मासी अष्टमीसी। येथे जो पूजील देवीसी। भक्तवत्सल देवी त्यासी। आनंदे सन्मुख येई सर्वदा।।२१।। शंकर सांगती आणिक तीर्थ। असे मंदिरापासून पश्चिमेस। मंदिरा पासून अंतर एक क्रोश। असे पावन हे तीर्थ।।२२।। येथे सिध्दाचा ईश्वर। पार्वतीसह प्रत्यक्ष परमेश्वर। लोकानुग्रह करण्या साचार। सोमशर्म्याने त्यासी प्रार्थिले।।२३।। ऋषी पूसती स्कंदासी। सोमशर्मा कोण सांगा आम्हासी। कोणता हेतू धरुन मानसी। प्रार्थिला तयाने उमापती।।२४।। स्कंद म्हणे सोमशर्मा नाम द्विज। होता सदाचारी द्विजोत्तम। एकदा यमुना पर्वती येऊन उत्तम। स्थान देवीचे पाहता झाला।।२५।। त्याने कल्लोळ तीर्थी केले स्नान। जगदंबेचे केले पूजन। तप येथे करावे म्हणोन। स्थळ एक तयाने पाहीले।।२६।। तेथेच वापी निर्माण करुन। स्वनामे तये लिंग स्थापून। त्याचे नित्य करितसे पूजन। पूजा साहित्य मेळवोनी।।२७।। बिल्व पत्र धत्तुर पुष्प। गंध अक्षता धूप दीप। विविध नैवेद्य मंगलदीप। नमस्कार प्रदक्षिणा तो करीतसे।।२८।। अखंड निराहार राहोन। नासाग्री ठेवोन लोचन। अखंड शिवाचे ध्यान आराधन। स्तुती करितसे तो शिवाची।।२९।। म्हणे जय जय शंभो शाश्वत। भर्ग महादेव उमाकांत। जलचंद्रकलाधर शंकर शांत। नीलकण्ठ तुज नमो नमः।।३०।। जय वृषभध्वज ईशान्य। जय गणेश खट्वांगधर भगवान। दिगंबर भस्मांग लेपन। त्रिशूलधारी तुज नमो।।३१।। स्कंद सांगे सर्व मुनिंसी। सोमशर्मा स्तवितसे शिवासी।

करी वंदन जोडोनी हस्तांसी। शंकर प्रसन्न झाले त्यासी।।३२।। शंकर बोलती मग विप्रासी। झालो प्रसन्न मी तुम्हासी। मागा आपण अपेक्षित वरासी। दुर्लभ असेल तरी देईन।।३३।। शंकराचे ऐसे ऐकोनी वचन। सोमशर्मा वदे हस्त जोडोन। द्यावे सतत देव संन्निधान। यापरते मज काही नको।।३४।। शंकर म्हणे तू निष्काम असशी। राही चिरकाल तू मम लोकी। तू जे स्थापिले लिंग येथेसी। मुक्तिदायक विख्यात होईल ते।।३५।। तुझे वापीत जे स्नान करती। सोमवारी उषःकाली निश्चिती। सोमेश्वराचे जे पूजन करती। राहतील निरंतर ते कैलासी।।३६।। वर ऐसा देती शिवशंकर। मग सोमशर्म्यास विमानी बैसवून। नेती कैलास पर्वती शिवगण। सांगती हे ऋषींसी शिवनंदन।।३७।। स्कंद म्हणती सांगतो तुम्हासी। आर्या देवी महात्म्यासी। सोमेश्वरापासून द्विकोश नैऋत्येसी। असे हे स्थान पवित्र।।३८।। तेथे साक्षात तुळजाभवानी। इंद्रे प्रार्थिले तिज हे स्थानी। इंद्रासी प्रत्यक्ष दर्शन देऊनी। राहीली तेथे जगदंबा देवी।।३९।। कोणे एके काळी देवराज इंद्र। अप्सरांसी घेऊनी बरोबर। आला तो यमुनागिरी समोर। सरिता तीरी अरण्यात।।४०।। तेथे अतिशय उत्साह पाहून। वनक्रीडा करुन पाकशासन। मग रात्री तेथेच बैसोन। करी चिंतन तो जगदंबेचे।।४१।। चिंतिताची देवी प्रगट झाली। इंद्र हात जोडोनी उभा राही। जगदंबेसी तो नमस्कार करी। परम विनय युक्त होऊनी।।४२।। इंद्र म्हणे जगदंबे लागून। पावन केले दर्शन देऊन। तैसेची तू

येथेची राहुन। करी पावन या जगासी।।४३।। अंबा वचन देई पाक शासना। म्हणे मान्य केले तव वचना। जाई आता तू स्वर्गभुवना। अप्सरा समुदाया समवेत।।४४।। जगदंबा म्हणे इंद्राप्रती। सांभाळीन तुज मी संकटी। ऐसे वचन देऊन त्यासी। जगदंबा तेथेची राहीली।।४५।। पावन झाले ते स्थान। जगदंबा राहीली तेथे जाण। यास्तव आर्या ऐसे नाम। त्या स्थळासी प्राप्त झाले।।४६।। स्कंद मग सांगे मुनींसी। यमुनाचलाच्या नैऋत्य दिशेसी। दूर आठ कोस अंतरावरी। स्थान असे मार्कंड ऋषींचे।।४७।। मृकंडतनय देवी पूजक। करिता झाला तेथे तप। देवी सुक्ताचा करुन पाठ। अयुत वर्षे केले अनुष्ठान।।४८।। त्याने तेथे केले कुंड निर्माण। त्रिकाल त्यात करी तो स्नान। नित्यकर्म करुन करी अनुष्ठान। क्षुधा तृषा तेणे जिंकिली।।४९।। जितेंद्रिय तो नवहि रंध्रे रोधून। ब्रह्म रंध्री ठेवी तो मन। तेणे ब्रह्मरंध्रापासोन धुम्र। उद्‌भवला लोकी भयंकर।।५०।। समस्त जग व्याकुळ झाले। देवांसीही भय उपजले। इंद्र मग देव गुरुसी बोले। कोण हा कोणाचे स्थान घेऊ पाहे।।५१।। इंद्र झाला मग भयभीत। माझे अथवा देवाचे अन्य। स्थान जिंकिण्या कारण। तप कठोर हा आचरितसे।।५२।। म्हणे शीघ्र उपाय सांगा मजसी। गुरु म्हणे नको शंका मानसी। हा असे निष्काम तपोराशी। देवीभक्त दृठ व्रत।।५३।। गुरु म्हणती हे वृत्रारी। त्वा स्थिर असावे अंतरी। शंका सारी सोडूनी दे दुरी। ऐकोन इंद्र नि:शंक झाला।।५४।। मार्कंड करितसे तप थोर। इंद्राचे मनी उपजला घोर। होतसे तो चिंतीत मन।

मन आशंकेनी वेढले।।५५।। काय करावे चिंता मानसी। नसे स्वस्थता त्याचे चित्तासी। झाला अस्वस्थ दिवसा निशी। करी मार्कंडेयाचा विचार।।५६।। ऐसीये परी अस्वस्थ होऊन। झाला इंद्र शंकायमान। मदन, वसंत आणि अप्सरागण। बोलावून आज्ञा करी त्यांसी।।५७।। म्हणे तुम्ही मृत्युलोकी जाऊन। मार्कंडेयासी करा विघ्न। त्याची तपश्चर्या भंगून। शीघ्र यावे मजपाशी।।५८।। शीघ्र सर्व आले भूतलावर। जेथे ऋषी तप करी दुस्तर। वसंते श्रृंगारिले वन समग्र। मग चतुर्विध कामिनी जातीच्या।।५९।। हावभाव युक्त नागर। सर्वही स्त्रिया लावण्यसागर। ज्यांच्या दर्शने होय विकार। तरुण पुरुषांचे चित्तासी।।६०।। अप्सराही करोनी शृंगार। आल्या मृकंड तनया समोर। हावभाव करोनी सुंदर। नृत्यारंभ करित्या झाल्या।।६१।। अप्सरा म्हणती तापसीसी। आमचे ऐक सौख्य पावसी। तप ते सुलभ पुढे तुजसी। परी स्त्री संयोग दुर्लभ असे।।६२।। हे तारुण्य निघून जाईल। मग कैसा स्त्री उपभोग घेशील। तपासी पुढेही आहे काळ। स्त्रीसुख अनुभवी आताची।।६३।। मोहविण्या त्या तापसीसी। येती अप्सरा नटुन त्या पासी। अन्य स्त्री फेडूनी वस्त्रासी। नग्न आली ऋषी पुढे।।६४।। मैथुनाचे विविधाविष्कार दावित। मोहविण्या त्याला गदगदा हासत। कामरागही बहु आळवीत। आलाप करिती सुस्वर।।६५।। ऋषिचे भंगविण्या व्रत। यत्न तयांनी केला बहुत। परी तो सर्वही झाला व्यर्थ। विमनस्क झाल्या मग तेव्हा।।६६।। इंद्रिय निग्रह करणे बहु कठीण। त्यातही अप्सरा

समोर असून। नाही विचलीत झाले मन। थोर तपस्वी मार्कंड ऋषींचे।।६७।। मार्कंडेयाचे तप अधिक। इंद्रियावरोध त्यापुढे काय। वैराग्य कडकडीत होते जेथ। काय करतील अप्सरा।।६८।। मुनीचा ऐसा दृढनिश्चय पाहुनी। त्वरीता जगदंबा तेची क्षणी। मुनीपुढे प्रकट होऊनी। प्रसन्न होऊनी बोलतसे।।६९।। मी प्रसन्न झाले तुजवरी। मागशील ते देईन झडकरी। स्कंद म्हणे मुनी प्रतापी भारी। वचन ऐकतसे देवीचे।।७०।। हळु नेत्र उघडोनी पाहे मुनी। त्याने समोर देखिली जगज्जननी। नम्रत्वे साष्टांग वंदन करोनी। हात जोडोनी उभा राहीला।।७१।। तुरजादेवी भक्तवत्सला। प्रसन्न झाली मुनिश्रेष्ठाला। म्हणे वरदान माग बाळा। मी असे प्रसन्न तुजवरी।।७२।। मुनी नम्रत्वे प्रार्थितसे तिजला। अन्य वर नको असे मला। तव चरण रजाचा स्पर्श मजला। नित्य लाभू दे देवी माते।।७३।। ऋषीसी मग हर्षे उठवून। अंबा बोलतसे वचन। वत्सा काय मागसी तप करुन। भक्ती तरी तुज पूर्वीच आहे।।७४।। आता मीच देते वरासी। जे असे दुर्लभ देवगंधर्वांसी। ऐसे बोलोन वरदानासी। देती झाली जगदंबा।।७५।। जैसा सर्व देवांमध्ये श्रेष्ठ। विष्णुच पूज्य अति वरिष्ठ। तैसा विप्रांमध्ये पूज्य श्रेष्ठ। तूच वरीष्ठ होशील।।७६।। स्वनामें तू मार्कंडेय पुराण। करी वेदार्थ प्रगट पूर्ण। निर्गुण त्रिगुणा अंगिकारुन। त्रिगुणात्मिकांस मी देवी।।७७।। ऐसे सुंदर पुराण रचून। तेथे करशील माझे स्तवन। ते पुराण जो करील पठण। माझ्या मंदिरी येऊन।।७८।। त्यांच्या घरी मी वास करोन। नित्य त्यांचे करीन रक्षण। ऐसे अतिश्रेष्ठ वरदान।

जगदंबा देई ऋषीसी।।७९।। आणिकही देई बहु वरदान। म्हणे त्वा तप केले पूर्ण। येथे मी तुज दिले दर्शन। तरी सतत येथेच राही तू।।८०।। मी सदा तुझ्या संन्निध्य राहीन। येथेच राहील पार्वतीरमण। त्रैलोक्यनाथ जो नारायण। येथेच राहील सर्वदा।।८१।। त्वा येथे कुंड केले खणून। ते पाप नाशक तीर्थ होईल पूर्ण। सुधाकुंड म्हणतील त्यासी जाण। माझ्या आज्ञे करुन।।८२।। या तीर्थाचे करीता स्नान। तेणे होईल पापखंडन। सर्व व्याधींचे ही निरसन। होईल माझ्या वरदाने।।८३।। स्नाने होईल पाप निवृत्ती। कर्मे स्वर्ग मोक्ष प्राप्ती। करुन देईल ऐसी शक्ती। या तीर्थामाजी राहील।।८४।। निरंतर शाश्वत ते भूमिवरी। प्रसिध्दी राहील निर्धारी। स्कंद म्हणे तुळजा परमेश्वरी। वरप्रदान त्यास देती झाली।।८५।। मार्कंडेयास ऐसा वर देऊन। देवी पावली अंतर्धान। स्कंद म्हणे या तीर्थी स्नान। तेणे पापमुक्त होती सर्व।।८६।। सुधाकुंडा मध्ये करुन स्नान। करतील जे जगदंबा पूजन। त्यांचे मनोरथ होतील पूर्ण। वरप्रसादे देवी मातेच्या।।८७।। तैसेच जे करती शंकरासी पूजन। विष्णु वैकुंठ निलयपूर्ण। ईशान्य प्रदेशी तीर्थापासून। असे पवित्र अत्यंत ते।।८८।। त्यांचे ही करीलजो पूजन। सर्व कामना होतील पूर्ण। अंती मुक्ती पावेल निर्वाण। यात संशय नसेची।।८९।। तपाने प्रसन्न केली देवी। तेथे मार्कंडेय कल्पजीवी। एकार्णव संपूर्ण जलशायी। विष्णु जेव्हा होतसे।।९०।। तेव्हाही मार्कंडेय होतसे स्थित। यास्तव चिरंजीवी म्हणती निश्चित। स्कंद हे सर्व मुनींसी सांगत। जे शंकरे वर्णिले वरिष्ठसी।।९१।। शंकरे कथिली मार्कंडेयाची। कथा वर्णुन मुनि वरिष्ठासी।

ऐकून धन्य झाले देव ऋषी। पावले मनी ते संतोष।।९२।। ऐसे असे हे महान क्षेत्र। नसे ऐसे अन्यत्र त्रिभुवनांत। जेथ वसती ब्रह्मा विष्णु शिव। देवी वसतसे अति हर्षित।।९३।। घेता त्या स्थलाचे दर्शन। शीघ्र होतसे पापमोचन। अलौकिक कृपा संपादून। होतील धन्य नर नारी।।९४।। म्हणती देवता वायुस्वरुप। होती प्रसन्न त्या नरास। जिंकीले जयाने आशा तृष्णेस। भवसागर सहज जाई तरुनी।।९५।। मृकुंड तनय धन्य ऋषिवर। जेणे केले तप घनघोर। नसे तया मनी कामना विकार। निर्मोही धन्य तो ऋषिवर।।९६।। सप्त चिरंजीवां मध्ये स्थान। लाभले तयासी देवी वरदान। सर्व देवही त्यावरी प्रसन्न। धन्य धन्य तो या भुवनी।।९७।। तुरजा भवानी देवी भक्तवत्सल। जिच्या कृपेचा लाभला वर। तिच्या प्रसादे देव अन् ऋषिवर। धन्य जाहले त्रिभुवनी।।९८।। मागणे मागतो तिजपाशी एक। स्वामी समर्थ भक्त मी गणेश। असावा सदा देवीचा वरद हस्त। या गणेश मस्तकी सर्वदा।।९९।। तिची कृपा असो निरंतर। होवो सुखी भक्त परिवार। स्वामी समर्थ कृपा थोर। असावी आम्हावरी सर्वदा।।१००।।

मोहक रुप ते वर्णिले सहाव्या अध्यायात। आनंद देऊनी ठेविती सुखात।।
मंद स्मित भवानीच्या मुखावरी। हिरे जडीत मुकूट शोभतो डोईवरी।।
आनंदाचा झुला मायेने झुलविती। या भक्त पामरास तूच सुखविती।।
।।श्री तुळजामाता चरणार्पणमस्तु।।

# अध्याय सातवा

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जय जय तुळजाभवानी माते। शरणागत भक्त प्रतिपालके। तव चरणी वंदन या गणेशाचे। समर्थ कृपे आलो तुझे चरणी।।१।। तुळजा भवानी महात्म्य सांगण्या। झाली मज समर्थांची आज्ञा। त्यांनीच वरदानी दिली प्राज्ञा। महात्म्य तुझे वर्णिण्याची।।२।। मागील अध्यायी वर्णिली कथा। झाली देवीभेटीस आतुर सीता। तिने ध्यायिली जगदंबा माता। दर्शन देवीचे ती मागतसे।।३।। तिची पाहुनी भक्ती थोर। आली स्वये जगदंबाच समोर। देऊनी सीतेसी वस्त्रालंकार। आलिंगन देवी देतसे।।४।। देवीने दिधले सीतेसी वरदान। म्हणाली तू रामभार्या धन्य। अंबेस झाले हे प्रिय स्थान। जेथे ती सीतारामासी भेटली।।५।। तैसेची वर्णिले आणि एक तीर्थ। सोमशर्म्यास प्रसन्न झाले शिव। सोमशर्म्याने स्थापिले जे शिवलिंग। शिवकृपे ते विख्यात झाले।।६।। त्या सोमेश्वराजवळ अति समीप। आर्या स्थान असे पवित्र। जाहली अंबा इंद्रास प्रसन्न। परम पावन स्थान वर्णिले।।७।। तैसेची वर्णिले मार्कंडेय स्थान। जिथे मार्कंडे केले तप थोर। अंबा प्रकट होऊनी देई वर। जाहली प्रसन्न

त्याजवरी।।८।। मार्कंडेय निष्काम निर्मोही मुनी। अंबा स्वयेच वर देती झाली। म्हणे वेदार्थ प्रकट करी पुराणी। मार्कंडेय पुराण होईल प्रसिध्द।।९।। तैसेची तयाने कुंड केले स्थापन। अंबा प्रसादे जाहले ते सुधाकुंड। पापनाशक जाहले ते कुंड। निरंतर शाश्वत राहील भूवरी।।१०।। ऐसी समग्र कथा पवित्र। वर्णिली तव कृपे गताध्यायात। आता पुढे चालवावया ग्रंथ। देई वरदान मजसी माते।।११।। नंतर स्कंद सांगती ऋषिंसी। आणिक एक तीर्था विषयी। अति पुण्यकारक ते जगती। असे वायव्य दिशी अंबेच्या।।१२।। तेथे साक्षात शूलपाणी। लोकानुग्रह करण्या लागुनी। रामेश्वर त्या नाम देऊनी। स्थापिला भार्गव रामाने।।१३।। रम्य भोगावतीचे तटी। जेथे सिध्द किन्नर निकटी। राहीला तेथे स्वत: धुर्जटी। सपरिवार उमे सहित।।१४।। असता कृष्ण चतुर्दशी तिथी। पर्वकाली तेथे जे वसती। स्नान करुनी भोगावती तीर्थी। रामेश्वरासी पूजिति जे।।१५।। ते आपणसह सर्व पितरांसी। तारिती संशय नसे यासी। अनन्य भावे रामेश्वरासी। यथा शक्ती पूजिती जे।।१६।। गंध अक्षत धत्तुर पुष्प। बिल्वपत्र धूप अन् दीप। नाना भक्ष्य उपहार अमूप। नैवेद्य समर्पण करिती जे।।१७।। पावतील अंती ते सायुज्यता। पावतील ते शिवसाम्यता। रामेश्वरा समान अन्य देवता। या भूमंडळी नसे दूजी।।१८।। रामेश्वराच्या उत्तर प्रदेशी। लिंग नागेश्वर नाम ज्यासी। भक्तानंद जन भक्त हितासी। असे जागृत ते सर्वदा।।१९।। या लिंगासी जे भावे पूजिती। त्यांची होईल पापनिवृत्ती। धार्तराष्ट्र नामा

नागेंद्र निश्चिती। त्यांनी स्थापिले हे लिंग।।२०।। या लिंगाच्या दर्शने करुन। मुक्ती मिळे दारिद्र्यापासून। नाना अरिष्टे टळती समग्र। व्याधी पासून मुक्ती मिळे।।२१।। सर्व कार्यार्थ सिध्दी पूर्ण। होय या लोकी निश्चित करुन। यात संशय नसे जाण। स्कंद सांगतसे मुनींसी।।२२।। तेथून जवळ परम स्थान। धारासुराचे असे जाण। जेथे दैत्येंद्र त्र्यैलोक्य तापन। इंद्रादि देव जिंकीले जेणे।।२३।। परम मायावी दैत्य दारुण। विष्णुने मारिला चक्रे करुन। लक्ष्मी सहीत स्वयं नारायण। वर देवोनी तेथेच राहीला।।२४।। तये वेळी स्कंदासी ऋषी पुसे। धारासुरे त्रैलोक्य जिंकिले कैसे। विष्णुने त्यास वधिले कैसे। सांगा सविस्तर ते आम्हासी।।२५।। ऐसे कोणते पुण्य म्हणून। जिंकिता झाला तो देवालागून। कोणते तप आचरले दारुण। कोण देव प्रसन्न केला ।।२६।। स्कंद म्हणे ऐका सकल। दैत्येंद्राचा पराक्रम प्रबळ। शंकर वरिष्ठा सांगे प्रांजळ। अनुक्रमे सांगतो तुम्हासी।।२७।। ब्रह्मदेवाचा प्रथम मानस पुत्र। मरिची नाम परम पवित्र। त्याचा तेजस्वी पुत्र कश्यप। सर्व लोक उत्पादक जो।।२८।। दक्षकन्या अदिती प्रमुख। त्रयोदशा भार्या कश्यपाच्या देख। अदिती पासून महेंद्रदिक। देव जन्मले द्वादश।।२९।। दितीस झाले दोन कुमर। हिरण्यकश्यप नामे असुर। त्या हिरण्यकश्यपुसी पुत्र पाच। झाले लोक विख्यात।।३०।। ऱ्हाद, अनुऱ्हाद, सऱ्हाद। महाऱ्हाद अन् पाचवा प्रल्हाद। महापराक्रमी ते विषद। लोकत्रयी विख्यात झाले।।३१।। प्रल्हाद पराक्रमी

बलवान। त्याचा पुत्र विरोचन। त्याचा पुत्र बली महान। असे दानशुर प्रतापी।।३२।। त्याचा एक पुत्र बाणासुर। दुसरा असे धारासुर। महाबलाढ्य दीर्घदर्शी शूर। धीर गंभीर प्रतापवंत।।३३।। यास्तव त्या धारासुरे भले। तीव्र तपासी आरंभिले। दहाहजार वर्षे लोटले। आराधन करी तो ब्रह्माचे।।३४।। देव जिंकावे समस्त। ऐसा असे ज्याचा मनोरथ। परि तो तपाविण निश्चित। सिध्द कदापी होणार नाही।।३५।। तप तयाचे पाहुन दुष्कर। ब्रह्मा करी विस्मय थोर। मग प्रसन्न होऊनी समोर। धारासुरासी तो बोलतसे।।३६।। ब्रह्मा म्हणे धारासुरा। दिती वंशजा परम धीरा। मी प्रसन्न झालो उत्तमवरा। माग अपेक्षित जे हवे।।३७।। स्कंद सांगे मुनिजनांसी। ऐकोनी ऐश्या विधी वचनांसी। नेत्र उघडोनी त्या वेळेसी। पाहता झाला दैत्य तो ।।३८।। अग्रभागी स्वये चतुराननासी। पाहताच हर्षला तो मानसी। मग उठोनिया वेगेसी। नमस्कार केला साष्टांगे।।३९।। हात जोडोनी म्हणे विधीसी। जरी प्रसन्न आहेस मजसी। तरी प्रमाण पूर्वक तुजसी। मागेन ते देई दुष्करही।।४०।। देवा पासोन मज भय नसावे। असुरापासोन कधी न व्हावे। गंधर्व उरगा पासोन नसावे। भय मजला कदापि।।४१।। मनुष्य सिद्धचारण यक्षाचे। भय कदापि नसो साचे। परि त्या वैकुंठ नायकाचे। भय मजलागी असावे।।४२।। त्रैलोक्यनाथा चतुरानना। हीच माझी तुज प्रार्थना। आमचे पूर्वज विष्णुभुवना। विष्णुभयानेच पावले।।४३।। हेच माझे मनोवांच्छित। त्वा पूर्ण करावे निश्चित। ब्रह्मा संतोषला बहुत।

ऐकोन वचन त्या दैत्याचे।।४४।। ब्रह्म म्हणे धारासुरा। बलीवंश यशवर्धन करा। जैसा पिता तुझा श्रेष्ठ उदारा। तैसाच धन्य अससी तू।।४५।। तुझा जनक बली हरीप्रिय। दैत्येंद्र तू ही तसाच निश्चय। त्रैलोक्यांत गाजे बलीचा विजय। तू ही तैसाची होशील।।४६।। त्वा वर जो मागितला निश्चित। ते सर्वही तुज होईल प्राप्त। माझे बोलणे मिथ्याभूत। कधी नोहे जाण बाळा।।४७।। महाविष्णु स्वये येऊन। हाती सुदर्शन घेऊन। तुझ्या देहासी छेदून। भाग करील निश्चये।।४८।। त्रैलोक्य पूज्य चक्रधारी। विष्णु राहील तव शरीरावरी। त्रिलोक माता त्रिपुर सुंदरी। अंबे समवेत निश्चये।।४९।। देवगंधर्व तेथे येतील। आणि ते पावन होतील। तीर्थे बहुतची राहतील। तुझ्या समीप तेधवा।।५०।। तुझा देह लिंगमय। होईल जाणा निःसंशय। विष्णु सायुज्य पावशील निर्भय। होशील दैत्यवरोत्तमा।।५१।। वरप्रदान ब्रह्मा पासोन। धारासुरे संपादून। मनात अति संतोषुन। स्वसदनासी जाता झाला।।५२।। स्कंद म्हणे दैत्य श्रेष्ठ। धारासुर तो परम वरिष्ठ। वरप्रसाद पावून यथेष्ट। सुखावला अति अंतरी।।५३।। दानवसेना परिवारा सहित। यमुनाचली होऊनी स्थित। राज्य करीतसे नीतियुक्त। महाबली तो पराक्रमी।।५४।। प्रशासन करोन सर्व दैत्यांसी। जे का असती पृथ्वीतल वासी। स्वाज्ञांकित करोनी सर्वांसी। राज्य करी तो पृथ्वीचे ।।५५।। शुक्राचार्य गुरुंच्या विचारे। सनातन धर्म आचरे बरे। सर्व पृथ्वीसी जिंकुनी सारे। लोक स्वाधीन ठेवले।।५६।। बलशाली तो

मदोन्मत्त। स्वर्गादि लोका जिंकू इच्छित। चतुरंग सेना घेऊन समवेत। प्रस्थान करीतसे तेधवा।।५७।। रथारुढहोऊनी तो दैत्यनाथ। दैत्य संग परिवारा सहीत। अमर पुरासी जाऊनी त्वरीत। दूतासी पाठवी देवेंद्राकडे।।५८।।दूत सत्त्वर जाऊन देवसभेसी। निरोप सांगती इंद्रासी। म्हणे धारासूर त्रिलोकासी। शासनकर्ता महाबळी।।५९।। त्याचाच दूत मी तुम्हासी। आज्ञा त्याच्या सांगायासी। आलो ते ऐकोन वेगेसी। मी सांगेन तैसे आचरावे।।६०।। देवराजा तू निश्चित। दुष्कर कर्म तुज झाले प्राप्त। भोग जे सर्व देवाप्रत। प्रशस्त मानावे सर्व राज्य।।६१।। विरोचनाचा बली असे पुत्र। तो माझा पिता प्रतापी थोर। जो विष्णुभक्त परम पवित्र। जित क्रोधा जित प्राण।।६२।। तो सर्व दैत्य जनेश्वर। तुम्हा देवांसी जिंकुन सत्वर। त्रैलौक्याचे राज्य समग्र। करिता झाला पराक्रमे।।६३।। मग त्वा महाविष्णू प्रार्थिला। मग तो अदिती पोटी जन्मला। वामन खुजट रुप घेऊन भला। वंचिता झाला पित्यासी माझ्या।।६४।। त्रिपाद भूमीची याचना केली। सद्भावे देता झाला बळी। वामने मग तनु वाढविली। त्रिपादासी केले अर्पण मही।।६५।। जेव्हा तो अच्युत श्रीहरी। बळीसी घाली पाताळ विवरी। तेव्हा पासोनी तू इंद्रा निर्धारी। उपभोग घेसी त्रिलोकाचा।।६६।। यासी दिवस झाले बहुत। आता दैत्याचा काळ झाला प्राप्त। जितका काळ त्वा भोगिला निश्चित। तितका काळ आम्ही भोगू।।६७।। मी तरी बळीचा सुत। त्रैलोक्य राज्य करीन निभ्रांत। दूत ऐसे बोले इंद्रा प्रत।

धारासुराचा प्रताप यथार्थ।।६८।। धारासुरे आराधिला चतुरानन। अजिंक्य लोकास झाला जाण। आणिक एक ऐक कारण। दूत सांगतसे इंद्रासी।।६९।। अदिती दिती दोघी युवती। कश्यपाच्या भार्या असती। अदिती पासोन जन्म निश्चिती। तुझा असे देवोत्तमा।।७०।। दिती पासोन आमचा जन्म। तरी असे दायादपणा सम। श्रुतीस्मृती युक्त हा नियम। विभाग भोक्ते आम्ही दैत्य।।७१।। साम उपाय आहे श्रेष्ठ। सामोपाये कार्य करिती वरिष्ठ। सौजन्य परस्पर असावे उत्कृष्ट। सामो पाथेर होतसे।।७२।। बुध्दिवंत जे सुजाण। त्यांनी साम उपाय सोडून। कलह विग्रह निष्कर्ष जाण। कदापिही न करावा।।७३।। साम उपाये कार्य न होय। तेथे दामरुप असे उपाय। दाम देताही न घडे कार्य। तरी भेद उपाय तो तिसरा।।७४।। प्रधानमंत्री आदि करुन। देशाधिप ग्रामाधिप जन। त्यांसी काही द्रव्य देऊन। आपुलेसे करुन घ्यावे।।७५।। त्या द्वाराने सैनिक सर्व। प्रयत्ने मोडावा एक विध भाव। तेणे ही कार्य न होय संभव। तरी मग उपाय दंड चवथा।।७६।। युध्दात तुम्हा कैसे बळ। अशक्त देव तुम्ही सकळ। आम्ही दानव दैत्य प्रबळ। महाबलाढ्य प्रतापी।।७७।। यास्तव सामोपाये सौजन्य। देऊनी राज्य करावे अर्पण। व्यर्थ सकळ देव सैन्य। नको मारु रे देवेंद्रा।।७८।। दूत मग सांगे इंद्रासी। माझे वचन तू न मानसी। तरी दैत्येंद्र धारासूर तुजसी। जिंकुन राज्य घेईल।।७९।। पूर्वीचे ते दैत्य थोर। त्यांचा केला त्वा अपकार। त्याचे उसने फेडील सत्त्वर। बलीपुत्र तो महाप्रतापी।।८०।।

स्कंद म्हणे तो दैत्यदूत। इंद्रासी बोलून राहीला निवांत। मग तो इंद्र विस्मय युक्त। हासून सभेत बोलतसे।।८१।। इंद्र म्हणे दैत्यदूतासी। माझी वचने सांग दैत्यवर्यासी। निःसंशय तू दायाद आहेसी। देवराजाचा विभागी।।८२।। जरी एका पित्या पासोन। मातृभेदे पुत्र झाले उत्पन्न। उत्तमाधम मध्यम जाण। नसती समान सर्व ते।।८३।। जरी एकबीज संभव। समान मानावे ते सर्व। श्रुती स्मृतीसी समान। विरोधभाव परस्परे होईल।।८४।। ज्येष्ठांश प्राप्त ज्येष्ठासी। त्याहून अर्ध मध्यम पुत्रासी। त्याहून अर्ध कनिष्ठासी। व्यवस्था धनाची होतसे ।।८५।। आणि पित्रार्जित वित्ताचा। विभाग होतसे साचा। अनुलोम विलोम पुत्राचा। विभाग संबंध नसेची।।८६।। स्वये संपादित द्रव्याचा। पिता विभाग देईल साचा। तो तरीही चर द्रव्याचा। स्थावर विभाग होत नाही।।८७।। स्थावराचा फक्त ज्येष्ठाधिकारी। इतरासी न मिळे निर्धारी। पित्रार्जित धनाची अशी खरी। विभाग व्यवस्था होतसे।।८८।। ज्याचे त्याने जे मिळविले। त्यात दुसऱ्याचा संबंध न चाले। आणि स्वर्गाचे राज्य भले। कश्यपे संपादिले नाहीच।।८९।। किंवा मरीचीने मेळविले। ऐसे तो काहीच नाही घडले। जरी कश्यपे असते संपादिले। तरी दैत्यासी विभाग मिळावा।।९०।। कश्यपासी स्त्रिया बहुत। त्यासी संतती असंख्य। सर्वासही विभाग प्राप्त। तेव्हाच तुम्हासी होईल।।९१।। आता आणि हे राज्य स्वर्गाचे। म्याची पराक्रमे मिळविले साचे। पिता किंवा पितामहांचे। संपादित हे राज्य नसेची।।९२।।

येथे विभाग दैत्यासी। मिळेलकैसा वेगेसी। इंद्र म्हणे दैत्य दुतासी। ईश्वर मर्यादा तीही ऐक।।९३।। स्वर्गी रहावे देवांनी। भूतळी असावे मानवांनी। पाताळीवास दानवांनी। दिती पुत्रांनी करावा।।९४।। असुराचे केवळ शरीर बळ। शास्त्र न मानिती खळ। तैसे आम्ही नोहेत सकळ। शास्त्रबळ थोर असे आमुचे।।९५।। शास्त्रबळ आणि शरीरबळ। द्विगुणित आमुचे असे बळ। दैत्य गर्व करील तो काळ। जोवरी वज्र माझे पाहीले नाही।।९६।। तोवरच बोलेल पौरुषयुक्त। तोवरीच राज्याशा ठेवील मनात। तो वरी दायादादि संबंध दर्शित। करुनी बोलेल दैत्य तो।।९७।। दैत्य शोणि जे स्निग्ध झाले। ऐसे वज्र नाही पाहीले। दैत्य भये मनी थरारले। वज्रासी माझ्या पाहता।।।९८।। जाय आता दूता सत्वरी। वचन माझे निवेदन करी। वार्ता कळवावी साचारी। हेच असे कर्तव्य दूताचे।।९९।। आता दूत जाऊन सत्त्वर। वार्ता दैत्येंद्रासी सांगेल। पुढे कैसे होईल समरांगण। पाहु या पुढील अध्यायी।।१००।।

सप्तम अध्याय जणू विशाल सागर। घेऊनी कुशीत दाविती मायेचा पाझर।।
माया ममता सर्व काही माय तुझ्याच पाशी। प्रसन्न करुनी भक्तास न ठेवी उपाशी।।
आई तुझाच गोडवा गात रहावा। तुझीच भक्ति एकच मनाचा हेवा।।
।।श्री तुळजामाता चरणार्पणमस्तु।।

## अध्याय आठवा

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्रीस्वामी समर्थ परमात्म स्वरुप। अवतार पूर्ण प्रकृति-पुरुष। वरकृपे त्यांच्या पावती सुख। भक्त परिवार सर्वदा।।१।। मी गणेश तयांचा चरणदास। स्वामी कृपेनेच हे जीवन साच। असे शिरी स्वामींचा वरदहस्त। भक्त तयांचा हे संचित माझे।।२।। तयांनीच हस्ती देऊनी लेखणी। रचना करण्या तुळजा नवशती। भक्ती तथैव दिली मती। म्हणुनी साहस करीतो मी।।३।। गताध्यायी पाहीले आपण। दैत्येंद्र इंद्राकडे पाठवी दूत। दूत आणि इंद्र संवाद समग्र। वर्णिला असे तयात।।४।। दैत्य दूत तेथून निघे सत्वरी। दूत तो येई दैत्येंद्रा प्रती। देवेंद्राचा निरोप तया प्रती। निवेदन समग्र करीतसे।।५।। तेणे दानव सर्व क्षोभले। सिध्दसेना करोनी निघाले। संग्राम उत्सवे धावती एकेका पुढे। वेढा घालती ते इंद्रपुरा ।।६।। स्वर्ग नगरी प्रवेशु पाहती। इतक्यात देवेंद्र तो शचीपती। देवसेनेसहित युध्दा प्रती। निघता झाला अतिवेगे।।७।। सज्ज केला तयाने रथ। सहस्राश्व जुंपले रथास। सुमुख दृढपार्ष्णी युक्त। दृढअक्ष चक्रें शोभती।।८।। शस्त्रास्त्र जाल भरले रथांत। त्याचे

किरणे प्रकाशवंत। सहस्रनयन सछत्र बैसे रथांत। रत्नजडित त्याचे दंड शोभती।।९।। देवराज निघे सैन्यासहित। युध्द करावया चालला त्वरीत। अग्नि मेषारुढशक्ती हातांत। मुख द्वय ज्याचे शोभती।।१०।। सप्त जिव्हा सप्त हस्त। चतुःश्रृंगी त्रिपादयुक्त। प्रलयांतक स्वसैन्यासहित। इंद्रासी अनुलक्षुनी निघाला।।११।। दंडपाणी महिषारुढहोऊन। रोगसेना सवे घेऊन। सर्वसाक्षी यम निघाला जाण। साथ देण्या इंद्रा बरोबर।।१२।। राक्षसाधिप नैऋती। खड्ग चर्म घेऊनी हाती। कुणुपारुढराक्षस सेना सांगाती। घेऊन निघाला इंद्रासवे।।१३।। वरुण मकरारुढपाशहस्त। स्वसेना घेऊनी निघे त्वरीत। वायु हरिणारुढअंकुश हातात। सेने सहित तो ही निघाला।।१४।। यक्षाधिप गदापाणी। पुष्पक विमानी आरुढोनी। यक्ष सेना सवे घेऊनी। कुबेर निघाला युध्दासी।।१५।। वृषारुढशूल हस्त। पिनाकपाणी प्रथम गणासहित। आदित्य वसुरुद्र साध्य मरुत। पितृगण अश्विनी निघाले।।१६।। विश्वदेव विद्याधर महोरग। सन्निध्द होऊनी समरग। नाना प्रहरणायुध सवेग। इंद्रा समवेत निघाले।।१७।। महाबलदेव सेनासहित। पुरंधर निघाला युध्दाप्रत। येई जेथे दैत्यसेना स्थित। नगरासी वेष्टोनी उभी होती।।१८।। प्रवृत्त झाले महायुध्द। उभय सेनानी क्रौर्य सन्निध। बाणसमूह सोडती विविध। परस्परांसी जिंकावया।।१९।। यम महिषारुढबळें। दैत्य सैन्यावरी चवताळे। दंड प्रहारे फोडिती कपाळें। महावीरांचे तेधवा।।२०।। यमाचे सैनिक उष्ण ज्वर। तैसाची धांवोनी शीत

ज्वर। पीडा करीती झाले फार। दैत्य सेनेस अतिवेगे।।२१।। धनुर्वात संधिवात। कासश्वासे पीडिले बहुत। अनेक रोग उठावले रणांत। दानव पाडिले धरणीवरी ।।२२।। दैत्य सेनेचे खुंटले बळ। यम भयाने पळती सकळ। किती एक होऊनी व्याकुळ। दंडून राहीले तेथेची।।२३।। धारासुराचा वीर सेनापती। विरुपाक्ष नाम बैसोनी रथी। धावत पातला रणक्षिती। यमाचे सन्निध ते वेळी।।२४।। त्वरेने त्याने दशबाण भात्यांतून। काढूनी धनुष्यावरी चढवून। बाणे यमासी तेणे विंधून। बोले वचन तो ते वेळी।।२५।। नाशिले तू मम सैन्य । परी ये मम अग्रभागी नीट। महाबुध्दि म्हणविसी परी चोरवट। मज पराक्रम दावी आपुला ।।२६।। सेनापतीचे बोलणे त्वरीत। ऐकोनी यम होई कोपयुक्त। सोडोनी त्याचे हृदयी बाण आठ। केले तयासी मूर्च्छापन्न।।२७।। परी तो सवेची सावध होऊन। दूर स्वव्यथेसी करुन। होऊनी अति कोपाय मान। शक्तीने यमासी हाणीत।।२८।। यमाने दंड घाते त्वरीत। शक्ती नासली हे पाहून। शूले यमाचे हृदयी मारुन। व्यथित केले यमासी।।२९।। व्यथेने व्याकुळ होऊन। तात्काळ व्यथेचे झाले निरसन। कालदंड हाती घेऊन शमन। बहु कोपायमान जाहला।।३०।। विरुपाक्षाचे हृदय लक्षून। दंडे ताडण करिताच जाण। विरुपाक्षाचे हृदय फुटुन। रथातून पडला भूमिवरी।।३१।। विरुपाक्ष पावला पतन। दैत्यपती आला धावून। दैत्यपतीने मारला तीक्ष्णबाण। यम मूर्च्छित होऊन पडला ।।३२।। यम मूर्च्छित झाला पाहून। धावला तात्काळ हुताशन। शक्तीने

दैत्यासी ताडून। चतुरंग सेना जाळीतसे।।३३।। वायु अनुकुल झाला अग्नीसी। तेणे तो पसरला चौपासी। अग्नि जाळीतसे दैत्य सैन्यासी। धारासुराने ताडीले अग्नीसी।।३४।। त्याने कुबेरासी युध्दी जिंकून। नैऋती जिंकला न लागता क्षण। वायु, चंद्र, यमासी जिंकून। सूर्य वसुरुद्रही तेणे जिंकीले।।३५।। धारासुर वचन बोले इंद्रासी। स्वपराक्रमे राज्य मिळाले बोलसी। तरी मी ही स्वतः दावून शौर्यासी। घेईन तुजला जिंकून।।३६।। युध्द करी जरी असेल शक्ती। नाही तर जा रसातळा प्रती। आम्ही आता स्वर्गाची संपत्ती। चिरकाल भोगू सुखाने।।३७।। इंद्रे कोपोनिया थोर। मारीले दैत्यासी दहा शर। अश्वासी सारथ्यासी सत्वर। नऊ बाणाने ताडीले।।३८।। बाणविध्द धारासुरे। कोपे इंद्रासी बाण सत्त्वरे। ताडीले अश्वासी बाण सहस्रे। सारथी विंधीला एक बाणे।।३९।। सेना पतन पावली पाहुनी। इंद्र आश्चर्य करे मनी। मग उठोनी तेच क्षणी। अग्नि अस्त्र सोडीले इंद्राने।।४०।। अग्नि प्रगटला दैत्य सेनेंत। जाळू लागला तो वाजी रथ। दैत्याने वरुण अस्त्रे त्वरीत। शमविला अग्नि तेधवा।।४१।। पर्जन्य अस्त्र सोडीले अद्‌भूत। देव सेनेवरी वृष्टी अत्यंत। होऊ लागली सवेची त्यात। विद्युल्लता बहु चमकती।।४२।। इंद्रे वायव्य अस्त्र सोडीले। मेघ सर्वही जिराले। जळ सर्वही शोषिले। वायुने पीडिले दैत्यांसी।।४३।। मग कोपोनिया धारासुर। पर्वतास्त्र तो सोडी सत्वर। वायु रोधोनी शिलावृष्टी थोर। देव सेनेवरी होती झाली।।४४।। गगनातून होई शिला पतन। तेणे देवसेना

होतसे चूर्ण। तेव्हा इंद्र वज्रास्त्र सोडून। निवारण केले पर्वताचे।।४५।। वज्रास्त्रे नाश दैत्य सेनेचा। अतिशय होऊ लागला साचा। पुन्हा पर्वत नामक ऋषी अस्त्राचा। प्रयोग केला दैत्याने।।४६।। इंद्रे लोपामुद्रा अस्त्र सोडून। कुंठीत केले मुनिअस्त्र जाण। ते पाहून तो बली नंदन। कोपला दारुण तये वेळी।।४७।। दैत्येंद्र गदा घेऊन हातात। इंद्राच्या वक्षस्थळी मारीत। तेणे इंद्र किंचित धूर्णित। कोपयुक्त बहु जाहला।।४८।। अमोघ वज्र घेऊन हातात। दैत्य मस्तकी तो प्रहार करीत। परी तेणे धारासुर किंचित। चलन पावला नसेची।।४९।। अमोघ वज्र झाले व्यर्थ। पाहुनी देव झाले भयग्रस्त। रथ सोडून पळाले त्वरीत। देव गंधर्व विद्याधर।।५०।। इंद्र विचार करोनी मनी। गेला रणभूमी टाकोनी। आपुलाले अधिकार सोडोनी। लोकपाल गेले दशदिशा।।५१।। दैत्येंद्रे सर्वावर स्वामित्व ठेवून। स्वाधीन केले त्रिभुवन। शंकर वरिष्ठा जे करी कथन। स्कंद सांगतसे ऋषींसी।।५२।। स्कंद म्हणे ऐसे धारासुरे। देव राज्य भ्रष्ट केले। मग मिळोनी देव सारे। गेले ब्रह्मयासी शरण।।५३।। म्हणती धारासुरे पीडिले। युध्दी आम्हासी जिंकिले। आम्हासी स्थान भ्रष्ट केले। ऐश्वर्य सर्व नेले आमुचे।।५४।। ब्रह्मा म्हणे धारासुर। तेणें तप केले दुर्धर। म्याच त्यास दिधला वर। तेणें उन्मत्त बहु झाला।।५५।। दैत्याचा त्या होऊन पराभव। तुमचे तुम्हासी मिळावे वैभव। याचा उपाय चिंतिला यास्तव। जावे शरण ऋषिकेशा।।५६।। स्कंद मग म्हणे ऋषींसी। ऐसे बोलून देवांसी। सर्वा सवे

घेऊनी महावेगेसी। पातला ब्रह्मा क्षीराब्धि तीरी।।५७।। शोभा तेथील पाहुन विस्मित। ब्रह्मरुद्र प्रमुख सुर समस्त। उत्तमतीरी जाऊन निश्चित। आरंभ करिती नारायण स्तुती।।५८।। म्हणती जल स्थल रुप नारायणा। दैत्य भयहरा दानव सूदना। दैत्या पासुनी करी रक्षणा। शरण आलो तुज आम्ही।।५९।। तूच आमुचे परम दैवत। तुझाच आश्रय आम्हा निश्चित। तूच आमुचा कैवारी सदोदीत। आम्हा स्वर्गस्था तू त्राता।।६०।। स्कंद म्हणे त्रैलोक्यनायक। विष्णु देवेश भक्त पालक। देवानी स्तविता कृपा सम्यक। करावया प्रगटला भूमिवरी।।६१।। मस्तकी किरीट विराजमान। दीर्घ चतुर्भुज श्रीवत्स लांछन। लक्ष्मी करीतसे पादसेवन। निजांकी चरण धरोनी।।६२।। घवघवीत तेजस्वी विष्णुमूर्ती। प्रगट झाली स्वयंज्योती। नेत्र गोचर होताच क्षिती। दंडवत नमती सुर सर्व।।६३।। मेघाऐसी गंभीर वाणी बोलत। महाविष्णु सर्व सुरगणा प्रत। म्हणे असे मज विदित। दैत्याचे चेष्टीत सर्वही।।६४।। तुम्हा देवांचे राज्य वैभव। दैत्याने हरीले सर्व। तुमच्या अधिकारावरी दानव। स्थापिले सर्व धारासुरे।।६५।। हा पूर्वीच सर्व वृत्तांत। नारदाने मज केला विदित। त्या विषयी उपाय निश्चित। योजून ठेवला आहे म्या।।६६।। तुम्ही सुरगण समस्त। होऊनिया निर्भय चित्त। गमन करावे स्वस्थळाप्रत। कार्य संपादिन मी तुमचे।।६७।। नमस्कार करुनी श्रीहरीसी। होऊनिया स्वस्थ मानसी। देव गेले स्वस्थानासी। रुद्र प्रमुख सर्व ही।।६८।। मग कोणते उपाये दैत्य नाश। होईल

जाणोनी सर्वेश। सत्य संकल्प ऋषिकेश। गरुडारुढहोऊनी तात्काळ।।६९।। आला यमुना पर्वताप्रत। जेथे धारासुर राज्य करीत। दानव ज्याचे आज्ञांकित। मंत्रदाता शुक्र असे ज्यासी।।७०।। धारासुर रम्य सभास्थित। दैत्य सभासद परिवारीत। तेथे नारदमुनी त्वरीत। सभेमाजी पातला।।७१।। नारदासी अवलोकुनी। धारासुर उठोनी तेच क्षणी। समोर जाऊनी लागला चरणी। उत्तम आसनी त्यांसी बैसविले।।७२।। नारदास म्हणे दैत्य नाथ। खरेच मी धन्य झालो आज। तुमच्या पदरजस्पर्शे मान्य। पवित्र झालो मी नारदा।।७३।। तुझे दर्शन ते विष्णु दर्शन। मजलागी झाले पूर्ण। आज्ञा करावी मज लागुन। सेवा सांगावी मजलागी।।७४।। नारद म्हणे त्वा पराक्रम करुन। स्वाधीन केले त्रिभुवन। पूर्वी पिता तुझा बलि महान। त्रिलोक शासन करीत होता।।७५।। तो तरी परम विष्णुभक्त। तैसाची तू ही असशी निश्चित। तुझ्या पित्यासी पाताळ स्थित। केले महाविष्णूने।।७६।। तू ही परम निर्वाण सिध्दी। विष्णु प्रसादे पावसी निरवधी। सुर गणांनी जाऊनी क्षीराब्धी। तीरी प्रार्थिला महाविष्णु।।७७।। तो तुज वधावया चक्रपाणी। आज येऊनी समरांगणी। तुज मारील स्वचक्रे करुनी। तुज कळवावया मी आलो।।७८।। दैत्येंद्र म्हणे बहु उत्तम झाले। विष्णुने स्वहस्ते मज मारीले। तरी मी धन्य मजवेगळे। सभाग्य त्रिलोकी नाही कुणी।।७९।। माझ्या पित्याने त्रैलोक्य अर्पण। महाविष्णुसी केले जाण। तैसेच मी ही सर्व अर्पण। करीन श्रध्देने नारदा।।८०।। देवऋषी ऐसे

त्याचे ऐकोन। जाताच तेथोन निघोन। कमलेक्षण नगरासमीप येऊन। शंख पांचजन्य फुंकीतसे।।८१।। त्या शंखाचा नाद उत्तम। ऐकोनिया दैत्योत्तम। जाऊन पाहे तव पुरुषोत्तम। गरुडारुढप्रत्यक्ष देखिला।।८२।। महाविष्णुसी पाहुनी। दानवश्रेष्ठ हर्षला मनी। तामस भाव धरोनी मनी। युध्दासी संन्निध पातला।।८३।। श्रीहरी म्हणे दैत्यासी। त्वा जिंकिले इंद्रादि देवांसी। त्यांचे ऐश्वर्य स्वये भोगिसी। दानव समुदाया समवेत।।८४।। आता तुज निश्चये मारीन। देव पाहतील तुझे मरण। त्यांचे राज्य त्यांसी देईन। हविर्भाग घेतील पूर्ववत।।८५।। ऐकोनी विष्णुचे वचनासी। असुर सवेची बोले त्यासी। हे षुरुषोत्तमा मी तुजसी। भिवोनी न जाय पाताळा।।८६।। मजलागी न जिंकिता। कोठे जाशील सांग आता। कोठे राहशील वैकुंठनाथा। बोल तत्त्वता ये वेळी।।८७।। स्कंद सांगे दैत्य वचन। ऐकोनिया नारायण। अति तीक्ष्ण दहाबाण। सोडोनी दैत्यासी विंधीत।।८८।। बाण विध्द झाला असुर। नाद करोनी भयंकर। गरुड मस्तकी गदाप्रहार। करिता झाला वेगेसी।।८९।। गरुड आणि धारासुर। या दोघांचे युध्द थोर। पाहुन सर्वलोक भयंकर। होते झाले ते समयी।।९०।। पक्षी आणि दानवेश्वर। एकमेकांसी करिती प्रहार। दोघे बल पराक्रमे थोर। कंप करिती भूमिसी।।९१।। त्या दोघांचे युध्द पाहुनी। सर्वही विस्मय करिती मनी। ऐसे युध्द करिता रणी। बहुत काळ लोटला।।९२।। तेव्हा जव तो दैत्यनाथ। गरुडासी धरावया धावत। तव गरुडाने चंचुपटात।

बळकट धरिले दैत्यासी।।९३।। गरगरा फिरवोनी शतवार। भूमीवरी आपटिला असुर। मुर्च्छा पावोनी धरणीवर। विकळ होऊनी तो पडिला।।९४।। मूर्च्छा सावरोनी दैत्यनाथ। विष्णुकडे आला धावत। तव विष्णुने गदा प्रहार त्वरीत। मस्तकी केला दैत्याच्या।।९५।। तेणे तो झाला मूर्च्छित। मूर्च्छा जावोनी सावध होत। त्रिशुल घेऊन हातात। कोपे मारीत विष्णुसी।।९६।। भगवान तेव्हा खड्ग घेऊनी। शूलासी शतखंड करोनी। टाकीले ते असुरे पाहुनी। गदा घेऊनी तो धावला।।९७।। तेव्हा श्रीहरीने त्वरीत। तीक्ष्ण बाण मारीला हृदयांत। दैत्य पुन्हा झाला मूर्च्छित। पुन्हा सावध झाला तो।।९८।। शक्ती घेऊनिया करी। मारीले त्याने हरी हृदयावरी। परि किंचित चळला नाही हरी। पुष्प प्रहारे गज जैसा।।९९।। दैत्याचा ऐसा पराक्रम पाहुनी। झाला विस्मय हरी मनी। स्वमायेने मोहीत करोनी। बोले हरी दैत्येंद्रासी।।१००।। काय बोलितसे हरी वचन। धारासुर दैत्येंद्रा लागुन। पुढील अध्यायी ते वर्णन। ऐकू या श्रोतृवृंद सारे।।१०१।।

करीता आठवा अध्याय पठण। आठही सिद्धी करीती नमन।।
सिद्धवान करविसी भक्तास। खुलविती सिंधू लक्ष्मी भांडारास।।
आई हेची मागणे सदा तुझ्या पाशी। जागा द्यावी मज तुझ्याच चरणापाशी।।
।।श्री तुळजामाता चरणार्पणमस्तु।।

# अध्याय नववा

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जय जय माते तुळजाभवानी। करी मज धन्य जगज्जननी। आलो विनित होऊन तव चरणी। स्वामी भक्त गणेश मी।।१।। तुझ्याच कृपे चालविली ही कथा। दिलेसी वरदान या स्वामीभक्ता। भक्तास्तव राहीलीस तू यमुना पर्वता। कृपा तव होवो या ग्रंथी।।२।। मागील अध्यायी पाहीले आपण। हरी बोलतसे दैत्यालागुन। काय असे ऐसे वचन। नंतर पुढे काय जाहले।।३।। स्वमाये दैत्यास मोहीत करुन। हरी म्हणे त्यास झालो प्रसन्न। माग तुज हवे ते वरदान। दुष्कर असेल तरी देईन।।४।। धारासुर म्हणे जरी वरदान देसी। तरी सायुज्यता द्यावी मजसी। नसो मज आता पुनरावृत्ती। अंबे सहीत रहा मम देहावरी।।५।। टाकावे मज शरीर छेदून। तुझेच चरणी जावा प्राण। हेची मागतो मी वरदान। देऊनी धन्य करावे मज।।६।। ऐसे ऐकोन तेव्हा विष्णुने। सुदर्शने धारासुराचे मस्तक छेदिले। तैसेची दोन्ही बाहु छेदीले। दैत्य पडला धरणीवरी।।७।। पाहूनी हे देव इंद्र प्रमुख। पुष्प वृष्टी करती बहुत। देव वाद्याचा गजर होत। अप्सरा नृत्य करती बहु।।८।।

धारासुरासी यमुना पर्वती। मारुनी त्याच्या देहा प्रती। मंथन करोनी भोगावती। नदी निर्मिली विष्णुने।।९।। शरीराचे नाम भोग। त्यासी मंथन करुनी श्रीरंग। जल निर्मिले त्याने अव्यंग। यास्तव भोगवती नाम त्यासी।।१०।। ती भोगावती पश्चिम वाहिनी। तिच्या केवळ उमगस्थानी। अनुग्रह कराया लोका लागुनी। राहीला भगवान कमलेक्षण।।११।। ऐकोनी ऐसी स्कंदाची उक्ती। ऋषी मग पूसती तया प्रती। येथे अन्य कोणती तीर्थे असती। तैसेच कैसे भोगावती जल आणिले।।१२।। स्कंद म्हणे तुम्ही मुनी भले। परम शुभदायक महात्म्य हे। ऐकोनी जीव मुक्ती पावे निश्चये। सांगेन सर्व मी तुम्हांस।।१३।। विष्णुने दैत्य देह मंथिला। तेव्हा रक्त प्रवाह निघाला। विष्णु प्रसादे तो जल झाला। झाली नदी भोगावती।।१४।। पश्चिम वाहिनी नदी भोगावती। तिचे जल पावन या क्षिती। तिच्या स्नानपाने पावन होती। प्राणी सर्वही भूलोकी।।१५।। तिच्या दक्षिण दिग्भागासी। शिव कपिलेश्वर नाम ज्यासी। कपाल पडले त्या प्रदेशी। धारासुर महान दैत्याचे।।१६।। भोगावतीच्या तटी मनोरम। लक्ष्मी तीर्थ अती उत्तम। लक्ष्मीने ते स्थान परम। पावन केले या भूलोकी।।१७।। लक्ष्मी तीर्थाच्या अति निकट। भगवान पुरुषोत्तम श्रेष्ठ। त्याच्या पश्चिमेस तीर्थ वरिष्ठ। पुरुष कूप नाम जयासी।।१८।। लक्ष्मी तीर्थाच्या पश्चिमेसी। ऋण मोचन वापिका नाम ज्यासी। विविध ऋण असती मानवासी। ते फिटतसे या क्षेत्री।।१९।। तेथेच पाप विमोचन तीर्थ। पापनाशक ते अति समर्थ। नृसिंह नाम हे महातीर्थ। भोगावतीच्या दक्षिण तटी।।२०।। त्याचेच दक्षिण दिशेसी अपर। तीर्थ पापनाशक ऐसे

नाम। तेथेच असे सूर्यकुंड तीर्थ। पावन उत्तम भूलोकी।।२१।। त्याच्या दक्षिण दिशी अर्ध योजन। वसे पार्वतीसह कैलासनाथ। आता जेथे भोगावती उद्भव। तेथोनी सांगतो तीर्थांसी।।२२।। जे स्थळी दैत्य मस्तक पतन। ते भोगावतीचे उद्भव स्थान। नागतीर्थ लोकैक पावन। नागेश्वर देव ते ठायी।।२३।। तेथोनी पुढे धारातीर्थ। परम शुभदायक समर्थ। मानव सर्व संसार गृह ग्रस्त। त्यांसी स्वर्गद्वार हेच निश्चित।।२४।। भोगावतीच्या उत्तर प्रदेशी। चक्रतीर्थ असे नाम ज्यासी। दुसरे कपिल तीर्थ पुण्यराशी। ते असे अतिशय पावन ।।२५।। जेथे कपिलऋषींनी याग। परम शोभन केला सांग। असती अन्यही तीर्थे सुभग। स्कंद सांगे ऋषींसी।।२६।। ऋषी म्हणती आता तीर्थ महिमा। सांगुनी पावन करा आम्हा। कृपा करुनी लोकांच्या श्रमा। करावे दूर स्वामिया।।२७।। तैसेच धारासुराच्या देहावर। कैसा विष्णु झाला स्थिर। कैसा कपिलाने केला अध्वर। कृपा करुनी सांगावे।।२८।। स्कंद म्हणे विष्णुने दैत्या मारीले। त्या दैत्याच्या देहांतून चांगले। पवित्र उत्तम उदक निघाले। ती भोगावती नदी झाली।।२९।। भगवान तेथे झाला स्थित। हे इंद्रादि देवा झाले विदित। येऊनी कृतांजली समस्त। त्याची स्तुती करु लागले।।३०।। देव करती बहुत स्तुती। प्रसन्न झाला लक्ष्मीपती। विष्णु सांगे सर्व देवांप्रती। मारीला मी धारासुर दैत्य।।३१।। आता निर्भय तुम्ही आपुले। राज्य करावे पूर्ववत चांगले। अंबेसहित मज रुचले। रहावयासी हे स्थल।।३२।। जगदंबेच्या आज्ञे करुन। स्थित झाला देवतागण। यास्तव हे स्थळ पुण्यपावन। श्रेष्ठ झाले अतिशय।।३३।। स्कंद म्हणे आता तीर्थमहिमा। सांगतो मी

ऋषी उत्तमा। भोगावती स्नान ज्या नरोत्तमा। माघमासी घडेल दिनत्रय।।३४।। त्यासी पुनरावृत्ती रहीत। विष्णु सायुज्य होतसे प्राप्त। तीर्थे बहु त्रैलोक्यांत। परी भोगावती सम नसती।।३५।। भोगावती तटी करीता श्राध्द। पितरा लाभे लोक ऊर्ध्व। वैशाख कार्तिक माघमासी स्नान। करीता विष्णुलोक मिळतसे।।३६।। आता नागतीर्थाचा महिमा। श्रवण करा हो द्विजोत्तमा। श्रावण शुध्द पंचमीसी नरोत्तमा। तीर्थस्नान घडेल ज्या।।३७।। त्यांनी यथाशक्ती अनुसरुन। नागेशाचे करावे पूजन। ब्राह्मण सुवासिनी भोजन। पायसादि पक्वान्ने घालावी।।३८।। शिवरात्रीस निराहार करुन। दृढभक्ती जितेंद्रिय होऊन। नागतीर्थ जले अभिषेक करुन। दीपदान करता मिळे शिवसायुज्य ।।३९।। जेथे धारासुर देह पतन होऊन। पावला तो विष्णुसायुज्य जाण। तेथे द्वारतीर्थ झाले निर्माण। सर्व लोकांसी पावन जे।।४०।। लक्ष्मी तीर्थी जलांत स्नान। अष्टमीसी सूर्योद्यी येऊन। भृगुवारी मंदवारी करिती जाण। त्यासी लक्ष्मी सदा भजे।।४१।। लक्ष्मी तीर्थाच्या तीरासी। यथारुची वायन ब्राह्मणासी। तैसेच द्यावे सुवासिनीसी। त्यासी लक्ष्मी प्राप्ती होईल।।४२।। लक्ष्मीतीर्थी एकादशी स्नान। जितेंद्रिये करावे विष्णुपूजन। सर्व उपचार समर्पून। रात्री जागर करावा।।४३।। पारणे करावे द्वादशीस। ऐसा जो नर द्वादशमास। व्रत करिता होईल त्यास। पुत्रभार्येसह वैकुंठ प्राप्ती।।४४।। स्कंद म्हणे तीर्थ ऋणमोचन। ज्याच्या स्नान पाने जन। मुक्त विविध ऋणांतून। होती सत्त्वर निश्चये।।४५।। एकदा मांडव्य मुनिश्रेष्ठ। तप करिता झाला उत्कृष्ट। भूमी खणोनी निर्मिले वरिष्ठ। तीर्थ एक तये

वेळी।।४६।। कालद्गय स्नान करुन। देव पितरांचे करी यजन। मुक्त झाला ऋणबंधनातून। म्हणोनी ऋणमोचन नाम झाले।।४७।। आता पापमोचन तीर्थ। शंकरे निर्मिले लोक हितार्थ। ज्याच्या दर्शनमात्रे समस्त। पातकांपासून होई मुक्ती।।४८।। आता नृसिंह तीर्थ उत्तम। करिता झाला पुरुषोत्तम। तेथे करिता स्नानपान। ब्रह्म प्राप्ती होय त्यासी।।४९।। नृसिंह तीर्थ तीरी जाण। जे नर करिती श्राध्द यज्ञ। ते आपणासह सर्व पितृगण। तारुनी जाती स्वर्गासी।।५०।। दुसरे पापनाशन तीर्थ। इंद्राने निर्मिले यथार्थ। स्नानमात्रे जळती समस्त। ब्रह्म हत्यादि पातके।।५१।। तेथेच असे सूर्यकुंड तीर्थ। तेथे चंद्र सूर्य ग्रहण व्यतिपात। भानुवार भृगुवार अन् संक्रांत। पर्वकाली स्नान करील जो।।५२।। तो सर्व रोगापासून मुक्त। अंति सूर्य लोकाप्रती जात। अश्विनमासी भानुवारी तेथ। प्रातःस्नान करोनिया।।५३।। देईल समंत्र जो अर्घ्यदान। सूर्यादि नामे नमस्कार जाण। करील तो व्याधी निर्मुक्त होऊन। सुखोपभोग भोगील यथेष्ट।।५४।। तेव्हा विष्णुने मारीला दैत्योत्तम। तेव्हा सर्वही सिध्दी घेऊन। सुस्थित तेथे झाला उमारमण। सिध्देश्वर नाम पावला।।५५।। भौमवारी सिध्देश्वर पूजन। करावे कुसुमाक्षता अर्पून। बिल्व धत्तुर कुसुमादि करुन। नानाविध पुष्पे समर्पावी।।५६।। दध्योदत नैवेद्य अर्पून। जो मानव पूजा करील पूर्ण। तो शिवाचा गण होऊन। शिव सन्निध सुखे राहे।।५७।। तैसेची आहे चक्रतीर्थ। धरणीसी मारुन चक्र। भगवते आणिले उदक। म्हणून नाम असे चक्रतीर्थ।।५८।। याच्या जलस्पर्शे करुन। नर मुक्त होती विघ्नापासून। करिता

तीर्थी स्नान श्राध्द दान। प्राप्त होती प्रयाग द्वारकापूर।।५९।। एकमास पर्यंत करिता सेवन। इतर तीर्थ देती फल पूर्ण। तैसे नोहे चक्रतीर्थ जाण। देई वैकुंठ स्नान मात्रे।।६०।। झाला सांगुन तीर्थ महीमा। स्कंद वक्ता पुराणाचा। ऋषीसी बोले मधुरवाचा। सांगे यज्ञाविषयी कपिल मुनींच्या।।६१।। योगीराज सिध्द कपिल मुनी। भोगावतीच्या उत्तर तटी। आदिदेवाची व्हावया तुष्टी। करती यज्ञ संभार मिळवूनी।।६२।। कार्तिकमास शुक्ल पंचमी दिनी। भृगुवार नक्षत्र रोहिणी। यज्ञारंभ श्रेष्ठ कपिलमुनी। करिता झाला तेधवा।।६३।। यज्ञार्थ पाचारिले जे मुनी। ते सपरिवार आले आश्रम सोडोनी। वसिष्ठ, अत्री, पराशर, जमदग्नी। भारद्वाज विश्वामित्रादि ऋषी।।६४।। यज्ञसंभार त्यांनी संपादून। खणोनी कुंडे केली निर्माण। मंडप चौसष्ट हस्त प्रमाण। षोडश स्तंभ संयुक्त।।६५।। उंचीसी तरी पंचहस्त। पवित्र काष्ठाने केले निर्मित। ध्वजा पताका शोभिवंत। सर्वही केले यथाशास्त्र।।६६।। अध्वर्यू याज्ञवल्क्यज तत्त्वतां। गौतमऋषी झाला होता। पराशर ऋषी उद्‌गाता। वसिष्ठ ब्रह्मा झालासे।।६७।। प्रस्तोता गालव ऋषी। कपिल यजमान त्या यज्ञासी। अन्य ऋषिगण ऋत्विज कर्मासी। करीते झाले ते काळी।।६८।। मंत्रोच्चार करुनी ब्राह्मण। अग्नीत घालिती अवदान। यज्ञ महोत्सव द्वादशदिन। कपिल मुनीचा होतसे।।६९।। देव संतुष्टीकारक यज्ञ झाला। मग करुनी अवभृत स्नानाला। बहु दक्षिणा देऊनी तोषविला। ऋत्विज मुनिगण कपिलाने।।७०।। ऐसा उत्तम यज्ञ करुन। खणोनी जल केले निर्माण। पवित्र गंगा जला समान। कपिल धारा नाम

ठेविले।।७१।। त्या तीर्थी करी जो स्नान पान। तो नर निष्पाप होऊन। शुध्द होय पुण्यवान। ब्रह्म लोकाप्रती तो जाईल।।७२।। जो रविवारी सूर्योदयी स्नान। करुनी कपिलेश्वराचे पूजन। यथाशक्ती जप करील जाण। वाचस्पती समान तो होईल।।७३।। जेव्हा अमावस्या सोमवती। कालयोगे येईल निश्चिती। तेव्हा स्नान दान जे येथे करती। धन्य होती या लोकी।।७४।। हा वृत्तांत जो करील श्रवण। त्यासी जगदंबा होई प्रसन्न। प्रसन्न होऊन देईल वरदान। मनोरथ सर्व पूर्ण करील।।७५।। तैसेच धारासुराचे आख्यान। जो नर यासी करील श्रवण। तो निष्पाप होईल जाण। यांत संदेह नसेची।।७६।। स्कंद सांगती मुनिजना प्रत। भैरव सर्व लोक रक्षणार्थ। शिवालयाचे ईशान्य कोनी स्थित। पूजन त्याचे करावे।।७७।। रविवारी भौमवारी भैरवाप्रती। तील तैलानें अभिषेक करती। माषान्न नैवेद्य जे समर्पिती। भैरव कुंडी स्नान करोनी।।७८।। तेणे सर्व विघ्नांचे भय। त्यासी कधीही न होय। या लोकी सुखभोग होय। जाईलअंती शिवपदा।।७९।। पाहता भैरवाचे सदन। व्याघ्र सर्प नृप चोर भय जाण। तैसेच शत्रुचे भय दारुण। कधीही न होय तयासी।।८०।। रोग व्याधी कधी न होती। दृढराहे शरीर स्थिती। स्कंद म्हणे म्या तुम्हा प्रती। तीर्थ महीमा वर्णिला।।८१।। ऐसी बहुत तीर्थे यमुना पर्वती। शुभदायक सर्वही असती। साकल्य वर्णिली तुम्हाप्रती। ही यथाविधी करावी।।८२।। भक्तिभावे तीर्थे करिती। त्यांची होय पापनिवृत्ती। अंती सायुज्यास पावती। ऐसे महात्म्य तीर्थांचे।।८३।। यापरी कथिले उत्तमोत्तम। जगदंबेचे महात्म्य मनोरम। हे भक्तिने श्रवण पठण

परम। करिता मनोरथ पूर्ण होती।।८४।। ऐसे तुळजा महात्म्य पूर्ण। षोडश अध्याय स्कंद पुराण। स्कंदाने ऋषीसी केले कथन। जे वरिष्ठसी सदाशिवे कथिले।।८५।। जगदंबेचे प्रेरणे करुन। अर्थ समजला तो लिहिला पूर्ण। न्युनाधिक जे ते क्षमा करोन। अंबा कृपावलोकन पहा।।८६।। असे माझे हे भाग्य परम। जगदंबा महात्म्य जे उत्तम। आज्ञा देती स्वामी करण्या वर्णन। लेखणी देऊनी लिहविती।।८७।। स्वामी परमात्मावतार पूर्ण। आदीमायेचे रुप करती धारण। होता नवरात्र प्रारंभ। माया शक्ती रुपे होती प्रकट।।८८।। तेच प्रत्यक्ष परमात्मा जाण। तेच मूळमाया पूर्ण। तेच जगद् जगताचे कारण। माऊली समान परी वर्तती।।८९।। माऊलीचे हे छायाछत्र। असे लेकरांविषयी वात्सल्य। म्हणुनीच लेकराचे अपराध। क्षमा करोनी घेती जवळ।।९०।। नवरात्रीचा हा काळ पूर्ण। आदीमायेची शक्ती जाण। असे जागृत सदैव म्हणून। होतसे ग्रंथ पूर्ण आज।।९१।। स्वामींस्तव जणु तुळजादेवी। आम्हावरी ऐशी कृपा करी। महात्म्य कथुनी पूर्ण करी। तुळजा नवशती मम हस्ती।।९२।। आता मी ही झालो आनंदित। असे देवीच या नवशतीत। या ग्रंथाचे जे करती श्रवण पठण। तुळजा प्रसन्न होई त्यावरी।।९३।। मी वैद्य गणेश स्वामी भक्त। लक्ष्मण असे मम जनक। सिंधु मम माता भाग्यवंत। त्यांचा सुत मी धन्य झालो।।९४।। आता एकची असे इच्छा मनी। स्वामी नाम असावे ध्यानीमनी। स्वामींची ऐसीच कृपा राहुनी। व्हावा धन्य जन्म माझा।।९५।। स्वामींची जी कृपा प्राप्त। कारण तयासी सर्व स्वामीभक्त। पाहुनी त्यांची भक्ती अलोट। स्वामी मजवरी प्रसन्न

झाले।।९६।। करुनी मज आपुला साधक। स्वामीच घडवती कर्म सम्यक। मी एक त्यांचा प्रिय भक्त। स्वामी कृपे कृतार्थ झालो।।९७।। आता हा नवशती ग्रंथ। व्हावा तुळजा मातेस प्रिय। स्वामींचेच जणु अद्वैत रुप। प्रकट झाले ग्रंथरुपातुनी।।९८।। इथे शब्द बनती अ - क्षरांतून। जे नेती अक्षरास क्षराकडून। नाद तयांचा अनाहतातून। होई प्रकट सदोदीत।।९९।। स्वामी माऊलीस करुन वंदन। तुळजा मातेस मनसा प्रार्थुन। करीतो हा ग्रंथ तया अर्पण। धन्य तेणे होई हा गणेश।।१००।।

पठण करीता नवम अध्यायास। परिपूर्ण करविसी या पामरास।।
घेऊनी कुशी या बालकाला। ज्ञानांजन घालोनी नेती सिद्धीला।।
जगी परम सिद्ध करविसी। हिच याचना करीतो भवानी मायेसी।।
।।श्री तुळजामाता चरणार्पणमस्तु।।

**श्रीशंकरबाबा महाराजांचा मंत्र**

३०/०७/२०१५ (गुरुपौणिमा)

।। ॐ स्वामी समर्थ।।

।। श्री गणेशाय नमः।।

ॐ नमो आदेश गुरुको कमलका फुलखिले। वैसे शंकर बाबा मन ही मन में डोले।
ज्वाला की लपटे उठे स्वर्ग में। शंकरजी का वर खोले भाग्य का द्वार।
डम डम डमरु डम डम बाजे। सुख का भाग्य सुभाग्य में खोले।
आठवे द्वार आठ वक्र आठ सिध्दी जावे। बुध्दी को खोले, रिध्दी खोलकर भावे।
स्वामी तु ही माय बाप। उंगली उठाके करे फरमान।
शंकरजी खुलाकर भाग्य। पातलसे पोहोचावे आसमान।
दिये समान तु ही शंकर बाबा। मै हुँ परवाना तेरी भक्ती का प्यासा।
लेके भाव रुपी मद। गिर गिर घुमता रहे तेरे पास।
एक होऊ तेरे रुप में। ऐसे मुढभक्ती की आस।
दिया डोलके समझावे परवाने को। खुद जलके प्रकाश देवे सबको।

जलने का भाग्य ही है मेरा। उसमे भी साथ देवे भक्तोंका।
शंकर बाबा बोले मै नही महान। महान तो हैं अवलीया स्वामी का जहान।
नाम लेवे, लेत रहे दिग्गज स्वामी का। मैं रहु पिछे हैं अरज मेरे मन का।
करता रहे सदा वायुरुपी संचारा। भक्तोके दुर्भाग्य को झट से फटकारा।
माया का जंजालजैसे मेघो घनों का ठेला। उसमे लगा है दु:ख ऋणो का मेला।
आई माई भाई सब तुही शंकर बाबा अकेला।
कैरी पत्तों के बीच मे कब तक रहेगी छुप। एक ना एक दिन बाहर लायेगी संसार की धुप।
बोले शंकर बाबा लेके स्वामी का नाम। जीवन बनावे गुरु माईका धाम।
कोटी मे कोटी महाकोटी। महाकोटी मे सप्तद्वीप की गोटी।
ऊस पे ब्रह्मंड की लोटी। अनंत कोटी गोटीयों का मालिक एक।
लेके हाथ में संभाले। ना करके चुक।
होके स्वामी पीर बांधे सबकी डोर। दंग करे भक्तों को खींचे अपनी ओर।
ज्ञान का दीप जले बुझावे जगत का घोल। फुंके गीता बजे ज्ञानेश्वरी का ढोल।
ऐसे ज्ञानदेव को करके नमन। झुकाके सिर होवे नमन।

समझलो ज्ञानबाबा को बुध्दी हुए गंग। जानलो मती को स्वामी नाम में होवे दंग।
शंकर बाबा बोले हाय रे हाय माया को झाडे। अकालमें उपरी मेघोसे अमृत वर्षा पाडे।
घडे को घडावे कुंभार। मिट्टी को देके आकार।
शंकर बाबा घुमाके चक्कर। स्वामी बाबा जीवन को देवे ठक्कर।
गुमसुम स्वामी मन ही मन सोचे। शंकर भगत की लिला से आनंदरुप सागर में मौजे।
शंकर बोले बोलके स्वामी माय बाप डोले। भक्ति रस के मस्ती में डुबे।
ऐसे मे स्वामी गण आनंदाश्रु डाले। विचार करनेसे ही भाग्य द्वार खोले।
स्वामीजी देवे वर शंकरजी करे उसे मौल। होके चमत्कार पथ्थर को बनावे फुल।
फुल से खिले सारा जहान।
रोग पिडा का कुवा हैं बहोत गेहरा। बुझालो उसे शंकर स्वामी दवा देके करो मोहरा।
दुवा देके नाथो की मन खोले शांती का द्वार।
आन लेके सच्चिदानंद स्वामीबाबा की आनंद में डुबे बारंबार।
लक्ष्मी भांडार खोले। सवारे रथ महान।
सात अश्व रथको है जोडे। हाके माया किचड से पोहोचने जन्नत दौडे।

मारे कुंची, झाडे जहान, मोहक बनावे परिसर। होके शंकरजी बागवान फुल फुलावे सुंदर।
ॐ श्रीम् ऱ्हीम् स्वामी भक्त शंकर महाराज नमो नमः।
गोल गोल गोले, डोल डोल डोले। बोल बोल बोले, खोल खोल खोले।
खोल के भाग्य द्वार। पहुचावे दसवे द्वार।
बैठावे शेष पर गावे भक्ती के गान। बदन को लगावे हिना दंग करे जान।
हर एक सांस मे बैठे तुम, अमृत का प्याला पिलावे तुम। घुम घुम घुमके करावे सुम।
झुलावे झुला देवे परमानंद। सदा ही भगत को देवे सत का आनंद।
ऐसी लिला शंकरजी के नाव मे समाई। स्वामीजीका लेके कृपा आशीर्वाद, भक्ति में समाई।

।। ॐ स्वामी ॐ स्वामी ॐस्वामी।।

।। हरी ॐ तत्सत्।।